cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१०५ | सोमवार दि.०५ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## भाजपाला दमदाटीचे राजकारण अंगलट येणार !

भाजप सत्ता मिळवण्यासाठी कोणत्या थराला जाऊन काम करत होती याची एक एक उदाहरणे समोर येऊ लागली आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून भाजपच्या विविध मागण्या काय होत्या आणि जे भाजपसोबत नाहीत त्यांना कसे बदनाम करण्याचा डाव टाकला जात होता, ते अनिल देशमुख यांच्या आरोपांतून समोर येत आहे. भाजपला आपल्या विरोधकांना बदनाम करून केवळ सत्ता हवी आहे आणि त्यासाठी ते देवेंद्र यांच्यासारख्या अनेक प्यादांचा वापर करत आहेत.

## आरबीआयकडून रेपो रेट दर जैसे थे

मुंबई: आरबीआय ने फेब्रुवारी २०२३ पासून रेपो दर अपरिवर्तित ठेवला आहे. या वर्षी जूनमध्ये, आरबीआय गव्हर्नरच्या नेतृत्वाखालील सहा सदस्यीय चलन धोरण समितीने बेंचमार्क रेपो दर सलग आठव्यांदा ६.५ टक्क्यांवर अपरिवर्तित ठेवण्याचा निर्णय घेतला. मध्यवर्ती बँकेने मे २०२२ ते फेब्रुवारी २०२३ दरम्यान पॉलिसी रेपो दरात सलग सहा वेळा वाढ केली होती. मध्यवर्ती बँकेने मे २०२२ मध्ये ४ टक्क्यांवरून सध्याच्या ६.५ टक्क्यांपर्यंत वाढ केली होती. शेवटचा बदल फेब्रुवारी २०२३ मध्ये झाला होता जेव्हा तो ६.२५ टक्क्यांवरून ६.५ टक्के करण्यात आला होता. चलनवाढीचा दर जूनमध्ये ५ टक्क्यांचा टप्पा ओलांडत आहे आणि अन्नधान्याच्या वाढलेल्या किमतींमुळे हेडलाइन रेटवर सततचा दबाव यांमुळे यथास्थिती कायम ठेवण्याचा निर्णय घेतला जाईल, असे परदेशी बँकांच्या अर्थतज्ज्ञांनी नमूद केले.

# मराठवाड्यातील शेतकऱ्यांना दिलासा!

### जायकवाडीत येणार पाणी, नाशिक–नगरच्या धरणांमधून मोठा विसर्ग सुरु

संभाजीनगर | प्रतिनिधी

राज्यात मध्य आणि पश्चिम महाराष्ट्रात सध्या दमदार पावसाची हजेरी लागली आहे. अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसाने राज्यातील धरणांमधला पाणीसाठा वाढला आहे. नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील धरण आणि बंधाऱ्यांमधून रविवार सकाळपासून विसर्ग सुरू आहे. परिणामी मराठवाड्यातील जायकवाडी धरणात पाणी येणार आहे. सध्या मराठवाड्यातील एकूण धरणसाठा हा १९.९१ टक्क्यांवर आहे. पावसाळ्याच्या दोन महिन्याच्या कालावधीत मराठवाड्यात पिकांसाठी चांगला पाऊस पडला असला तरी धरणे आणि जलसाठ्यांमध्ये पाणी आलेले नाही. यामुळे शेतकरी चिंतेत आहे मात्र आता जायकवाडीत धरणात पाणी येऊ लागल्याने मराठवाड्यातील शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळणार असून, पुढील काळात लागणाऱ्या पाण्याची चिंता सद्या तरी मिटणार आहे.

पावसाला जवळजवळ दोन महिने होत आले असले तरी मराठवाड्यातील बहुतांश ठिकाणी समाधानकारक पाऊस नसल्याने धरणे अजून कोरडीच असल्याचे चित्र होते. ◀◀ पान २ वर



### मराठवाड्याला अजूनही प्रतिक्षा

मराठवाडा विभागात ११ मोठे, ७५ मध्यम तर ७४९ लघु प्रकल्प आहेत. गोदावरी, तेरणा, मांजरा, रेणा नदीवर ४२ बंधारे आहेत. एकूण ८७७ प्रकल्पांमध्ये अवघा २० टक्क्यांपर्यंत जलसाठा आहे. उत्यामुळे लघु आणि मध्यम प्रकल्प दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

### गोदावरी नदीपात्रात होतोय विसर्ग

नाशिक विभागातील धरणांमधून सध्या विसर्ग सुरू असून गोदावरी नदीपात्रात पाणी वाढत आहे. दारणा धरणातून २२,९६६ क्युसेकने विसर्ग सुरू असून नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून ३६ हजार ७३१ क्युसेकने गोदावरी पात्रात विसर्ग सुरू आहे. सध्या नदीतील पाणी पातळी ही ४६८.४९ मी. इतकी आहे. यासह नेवासा शेंदूरवादा या भागातूनही गोदावरी पात्रात विसर्ग सुरू आहे.

## ओबीसी बहुजन पार्टी राज्यात २०० जागा लढवणार

### बीड जिल्ह्यातही ६ जागेवर उमेदवार देणार–प्रा.टी.पी.मुंडे



बीड | प्रतिनिधी

सध्याची सामाजिक स्थिती खराब असून याला महाविकास आघाडी आणि महायुती कारणीभूत आहे. ओबीसी समाजाला असुरक्षित वाटत असून आपले आरक्षण सुरक्षित नसल्याची भावना त्यांच्या मनात आहे. त्यासाठी आम्ही ओबीसी समाजाच्या सोबत असून राज्यातील २०० विधानसभा मतदार संघात ओबीसी बहुजन पार्टी उमेदवार देणार आहे. तसेच बीड जिल्ह्यातील ६ जागा आम्ही लढवणार असल्याचे ओबीसी नेते प्रा. टी.पी. मुंडे यांनी शासकीय विश्रामगृहावर झालेल्या ◀◀ पान २ वर

## भेसळयुक्त दुधाचा भांडाफोड; १३ हजार किलो पावडर जप्त

### आष्टी तालुक्यात तीन जिल्ह्यातील पथकांची संयुक्त कारवाई; गुन्हा दाखल, एकास अटक

आष्टी/म्हसोबाचीवाडी | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामधील कडा येथील टाकळी अमिया रोडवरील एका पत्र्याच्या शेडच्या गोदामात भेसळयुक्त दूधाचा भांडाफोड करण्यात आला आहे. यावेळी भेसळीचे दुध तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या १३३६८ किलो पावडरचा साठा धाड टाकून जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई तीन जिल्ह्याच्या पथकाने संयुक्तरित्या रविवारी पहाटे केली. या कारवाईत ११ लाख ८५ हजार



०६८ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यात दुधाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात असून भेसळयुक्त दुधाचा गोरखधंदा ◀◀ पान २ वर

### जप्त केलेले भेसळीसाठीचे साहित्य

६ लाख ८७ हजार ६७२ रुपयांची पोटॅशियम हायड्रॉक्साइड फ्लेक्स, कॉस्टिक पोटॅशियम फ्लेक्स, ट्राय सोडियम सिक्रेट, कॉस्टिक सोडा फ्लेक्स ही भेसळ पावडर ६,९४२ किलो सापडली. भेसळयुक्त दुध तयार करण्यासाठी या पावडरचा वापर केला जात होता.

### भेसळयुक्त दुधाचा पुरवठा नेमका कुठे?

चौधरी यांच्या भेसळयुक्त दुधाच्या कारखान्याचा भांडाफोड केला असून ते बऱ्याच वर्षापासून हा व्यवसाय करीत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे चौधरी हे आतापर्यंत भेसळयुक्त दुध नेमके कुठे पाठवत होते, याचा शोध घेण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान आहे. या गोरखधंद्यात बडे मासे अडकण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे.


## एससी, एसटींना क्रिमीलेयर नको–आंबेडकर



मुंबई: एससी अर्थात अनुसूचित जाती आणि एसटी अर्थात अनुसूचित जमाती च्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणामधील क्रिमीलेयरच्या विरोधात असल्याची भूमिका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विटरच्या माध्यमातून स्पष्ट केली. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी पुढे आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, न्यायमूर्ती गवई हे क्रिमी लेयरवर प्रवचन देत आहेत. ◀◀ पान २ वर

## लढाईआधीच आ.प्रकाश सोळंके विधानसभा रणांगणातून बाहेर

### पुतण्या जयसिंग सोळंके हेच राजकीय वारस म्हणून घोषित



माजलगाव | प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या रणांगणातून लढाईआधीच आमदार प्रकाश सोळंके यांनी माघार घेतली असून पुतणे जयसिंह सोळंके यांना त्यांनी आपला राजकीय वारसदार म्हणून घोषित केले आहे. याबाबत आ. सोळंके यांनी त्यांच्या फेसबुक पेजवर ही माहिती दिली आहे. त्यामुळे आता माजलगाव मतदारसंघात वेगळ्या राजकीय समिकरणाला सुरुवात ◀◀ पान २ वर

**आ. सोळंके यांचा सोशल मिडीयावरील संदेश**

आपल्या डोळ्यासमोर आपली युवा पिढी तासून सुलाखून निघाली पाहिजे. म्हणून माजलगाव मतदारसंघ ज्यांच्याकडे युवा नेतृत्व म्हणून पाहतो ते माझे पुतणे श्री. जयसिंग सोळंके यांच्याकडे पुढील नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्याचा माझा मानस आहे. आजपर्यंत जे भरभरून प्रेम, आशीर्वाद माझ्या पाठीशी आपण दिले. ते इथून पुढील काळात भैय्यांच्या मागे उभे करून त्यांना पाठबळ द्यावे, ही विनंती यावेळी केली. असा आ. सोळंके यांचा सोशल मिडियावर संदेश आहे.

## श्रीक्षेत्र अरण तीर्थक्षेत्र विकासासाठी आवश्यक तेवढा निधी देणार–फडणवीस

**संत शिरोमणी सावता महाराज विकास आराखड्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणार – मंत्री छगन भुजबळ**

**फडणवीस, भुजबळ व गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते संत शिरोमणी सावता महाराज भक्तनिवास वास्तुशिल्प कामाचे भूमिपूजन**

सोलापूर | प्रतिनिधी

श्री क्षेत्र अरण तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासाच्या आराखड्यातील १०० कोटीचा पहिला हप्ता आपण आज मंजूर करत असून या तीर्थक्षेत्राला अ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तर संत शिरोमणी सावता महाराज विकास आराखड्यासाठी शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे असे मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. श्री.संत शिरोमणी सावता महाराज यांचे समाधी मंदिर असलेल्या श्री क्षेत्र अरण येथे रविवारी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न, नागरी



पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ आणि मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले.

यावेळी महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर आमदार प्रा. राम शिंदे, आमदार जयकुमार गोरे, आमदार योगेश टिळेकर, आमदार राम सातपुते, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार राम कांडगे, बळीराम ◀◀ पान २ वर

**बाजारभाव**

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०३ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :१.५० क्विंटल | २,५०१ | २,५११ | २,५०६ |
| ज्वारी/हायब्रिड :३१.०० क्विंटल | २,१५७ | २,६६२ | २,३६१ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : २.०० क्विंटल | ९,४०१ | ९,४०१ | ९,४०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: १२.०० क्विंटल | २,४६१ | ३,४०० | २,७५२ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १३.०० क्विंटल | ४,२६० | ४,३०० | ४,२८० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,५०० | ६,५९९ | ५,६५१ |










cmyk

अग्रलेख

# भाजपाला दमदाटीचे राजकारण अंगलट येणार!

भाजप सत्ता मिळवण्यासाठी कोणत्या थराला जाऊन काम करत होती याची एक एक उदाहरणे समोर येऊ लागली आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून भाजपच्या विविध मागण्या काय होत्या आणि जे भाजपसोबत नाहीत त्यांना कसे बदनाम करण्याचा डाव टाकला जात होता, ते अनिल देशमुख यांच्या आरोपांतून समोर येत आहे. भाजपला आपल्या विरोधकांना बदनाम करून केवळ सत्ता हवी आहे आणि त्यासाठी ते देवेंद्र यांच्यासारख्या अनेक प्यादांचा वापर करत आहेत.

आमच्या सोबत या नाहीतर तुरुंगात जा, अशीच दमदाटी पडद्याआडून केली जाते आणि केंद्रीय यंत्रणांच्या मदतीने आणि प्रसारमाध्यमे समाजमाध्यमे यांच्याद्वारे बदनामी करून भाजप त्या व्यक्तींना आपल्या पक्षात ओढतो. जे भाजपच्या या छळवादासमोर झुकले नाहीत त्यांना त्याची भारी किंमत चुकवावी लागली. त्यातीलच एक उदाहरण आहे अनिल देशमुख यांचे. त्यांनी नुकताच एक मोठा गौप्यस्फोट घडवून आणला आहे. अनिल देशमुख यांचे गंभीर आरोप महाविकास आघाडी सरकार पाडण्यासाठी खोटे प्रतिज्ञापत्र तयार करून द्या, तुमच्यावर कुठलीच कारवाई करणार नाही, असे सांगत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्याकडे त्यांच्या विश्वासातील व्यक्तीला पाठवले होते, असा गंभीर आरोप माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला. मी प्रतिज्ञापत्र भरून दिले असते तर तीन वर्षांपूर्वीच महाविकास आघाडीचे सरकार कोसळले असते, असेही त्यांनी सांगितले. अनिल देशमुख यांनी याबाबत सविस्तर पोलखोल केली आहे. त्यावर भाजपाने वाझे याला पत्रं लिहायला लावून नवा डाव टाकण्याचा प्रयत्न केला मात्र त्याला धार आली नाही. ईडीच्या आरोपांनुसार गृहमंत्री म्हणून काम करताना अनिल देशमुखांना, तत्कालीन मुंबई पोलीस सहाय्यक निरीक्षक सचिन वाझे यांच्यामार्फत विविध अंऑर्केस्ट्रा बारमालकांकडून सुमारे ४.७ कोटी रुपयांची बेकायदेशीर रक्कम प्राप्त झाली, जी त्यांनी वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये गुंतवली. देशमुख सीबीआय चौकशीला नऊ तास सामोरे गेले. सीबीआयकडे काही पुरावे असते तर देशमुखांना अटक करू शकले असते. परंतु सीबीआयकडे परमबिरसिंग यांनी केलेले ऐकीव माहितीवर आधारित असलेले आरोप या व्यतिरिक्त दुसरा पुरावा सापडला नाही. दरम्यानच्या काळात देशमुख यांच्यावर विविध आरोप करीत त्यांच्या कार्यालयासह घरावर धाडी टाकण्यात आल्या. त्यामागे कुठलाही कायदेशीर तर्क नव्हता. देशमुख कुटुंबीयांना, महाविकास आघाडी सरकारला बदनाम करण्याच्या उद्देशानेच हे छापासत्र सुरू होते. बोगस आरोप आणि फरार आरोपकर्ते देशमुखांच्या विरोधात आरोपांचा सारासार विचार केल्यास परमबिरसिंग यांच्या आरोपांपासून सुरू झालेला प्रवास सीबीआय-ईडी-आयकर विभाग ते न्यायालयीन कोठडी असा आहे. आरोप झालेली कुठलीही रक्कम जप्त झालेली नाही. उल्लेखनीय म्हणजे स्वतः आरोप करणारे परमबिरसिंग हे बेपत्ता होते, त्यांच्या विरोधात ते पळून गेल्याची कारवाई सुरू झाल्यावर स्वतःची मालमत्ता वाचवायला ते हजर झाले. परमबिरसिंग यांनी चांदीवाल आयोगाला वकिलांच्या माध्यमातून प्रतिज्ञापत्र पाठवले. त्यात ते म्हणतात, मी केलेले आरोप हे ऐकीव माहितीवर आधारित आहेत म्हणून माझी उलटतपासणी होऊ नये. वास्तविक कायदेशीरदृष्ट्या अगोदर परमबिरसिंग यांनी केलेले आरोप या प्रतिज्ञापत्रामुळे संपुष्टात यायला हवे. अनिल देशमुखांच्या विरोधात कुठलाही सबळ पुरावा नाही, हेच यातून स्पष्ट होते. केवळ केंद्राच्या व राज्य भाजपच्या हट्टापायी देशमुख यांना खोट्या आरोपात गोवण्यात आले. तक्रारकर्ते म्हणून परमबिरसिंग यांची विश्वासार्हता यामुळे संपुष्टात आली.

अनिल देशमुख यांना अखेर १४ महिन्यांनी उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. तत्पूर्वी काही दिवसांपूर्वी सक्तवसुली संचालनालयाने दाखल केलेल्या गुन्ह्यांप्रकरणी देशमुख यांना जामीन मिळाला होता. उच्च न्यायालयाने सीबीआयच्या प्रकरणातही जामीन मंजूर केल्यामुळे त्यांचा तुरुंगाबाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला. परंतु भ्रष्टाचार आणि खंडणीच्या गुन्ह्यात जामीन मिळाला नसल्याने अनिल देशमुख यांचा मुक्काम तुरुंगातच होता. वेगवेगळे मुद्दे पुढे करत त्यांचा तुरुंगातील मुक्काम वाढवण्यात आला. ही एक प्रकारची छळछावणीच होती असे म्हणावे लागेल. अनिल देशमुख यांनी जर त्यावेळेस देवेंद्र फडणवीस यांचे ऐकून त्यांच्या सांगण्यानुसार उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि अजित पवार यांच्यावर आरोप करणारे प्रतिज्ञापत्र करून दिले असते तर त्यांची या १४ महिन्यांच्या तुरुंगात राहण्यापासून सुटका झाली असती. मात्र त्यांनी असत्याची बाजू घेतली नाही आणि ते लढले. तुरुंगात गेले. भाजपची छळछावणी त्यांनी स्वीकारली. यामुळेच येत्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनता भाजपच्या या छळछावणीला उखडून फेकेल अशी सद्य परिस्थिती आहे.

# शेतकरी चळवळीचे प्रेरणास्थान मा.आ.भीमरावजी धोंडे

भारत देश हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील बहुसंख्य व्यक्ती आजही खेड्यामध्ये वास्तव्य करतात म्हणूनच भारत देश हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. महात्मा गांधी नेहमी म्हणायचे 'खेड्याकडे चला' परंतु आधुनिक युगात जागतिकीकरण व आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे युवक युवतींना शहरी भागाचे आकर्षण वाढू लागलेले आपणास दिसून येते परंतु खरा भारत देश हा खेड्यातच आहे मात्र आज खेडी ओस पडू लागलेली आहे. शहरीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे कृषी प्रधान अर्थव्यवस्था मोडकळीस येऊ लागलेली आहे.

भारतात शेतकरी चळवळीस १९७० च्या दशकात चरण सिंग यांनी शेतकरी चळवळीचे नेतृत्व केले. महाराष्ट्रामध्ये १९८० मध्ये शरद जोशी यांच्या नेतृत्वात शेतकरी संघटनेची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी अहोरात्र झटणारे, आष्टी ते मुंबई, आष्टी ते दिल्ली पायी मोर्चा काढून शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी सतत प्रयत्न करणारे कुशल नेतृत्व म्हणजेच मा. आ. भीमरावजी धोंडे होय.बीड जिल्ह्याच्या राजकारणात मा. आमदार भीमरावजी धोंडे यांचे नाव आदराने व सन्मानाने घेतले जाते. शांत व संयमी नेतृत्व, जात-पात धर्म भेद न करता सरळ मार्गाने राजकारण करणारे, सतत शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी जागरूक असणारे कुशल नेतृत्व म्हणजेच मा आ. भिमरावजी धोंडे होय. कै. गोपीनाथराव मुंडे यांचे परममित्र म्हणून भीमरावजी धोंडे हे संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहेत. सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखात सहभागी होऊन त्यांना आधार देऊन, जनसामान्यात मिसळून त्यांचे प्रश्न प्रभावीपणे सोडविण्यासाठी सतत प्रयत्न करणारे कुशल नेतृत्व म्हणजेच मा. आमदार भीमरावजी धोंडे होय.

मराठवाड्यातील ग्रामीण भागात आजही अनेक शेतकरी विविध कारणास्तव आत्महत्या करताना दिसतात याचा सखोल अभ्यास मा. आमदार भीमरावजी धोंडे यांनी करून या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी मराठवाड्यातील ग्रामीण भागात मोठमोठ्या जलसिंचनाच्या सोयी असणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात पिक विमा योजना प्रभावीपणे राबवली गेली पाहिजे. ग्रामीण भागातील सावकाराच्या त्रासातून शेतकऱ्यांची मुक्तता झाली पाहिजे. शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. दलाला कडून होणारी फसवणूक थांबली पाहिजे. पतसंस्था व ग्रामीण बँके मार्फत गरीब शेतकऱ्यांना अल्प व्याज दराने दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध झाले पाहिजे.



ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुला मुलींना मोफत शिक्षण, वह्या पुस्तके वाटप, शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सोय होणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील जातिव्यवस्था व अज्ञान अंधश्रद्धा कमी होणे काळाची गरज आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करून त्याचे संवर्धन होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात सरकारी योजना योग्य प्रकारे पार पाडल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो.शेतकऱ्यांना बी बियाणे व रासायनिक खताची माहिती कृषी विभागांनी व्यवस्थित दिल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. शेतकऱ्यांनी शेती व्यवसायाबरोबरच पशुपालन, कुकुट पालन, शेळीपालन व दुग्ध व्यवसाय करून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करावा. कृषी अधिकाऱ्याचा सल्ला घेऊन शेतीतील उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन शेतकरी आत्महत्येपासून दुर होऊ शकतो असे मत मा.आमदार भीमरावजी धोंडे साहेब यांचे आहेत.

महाराष्ट्रातील बीड जिल्हा म्हणजे मागासलेला जिल्हा, शेतकरी, शेतमजुरांचा जिल्हा म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहे. बीड जिल्ह्याच्या राजकारणात मा. आमदार भीमरावजी धोंडे यांना शिक्षण महर्षी, दिन दलित, शेतकऱ्यांचे नेते म्हणून ओळखले जाते. सत्ता असो किंवा नसो सतत शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आंदोलने, मोर्चा, निषेध इत्यादी मार्गांचा अवलंब करून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील गरीब, दिन दलित, शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या मुला मुलींसाठी शिक्षणाची व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी' शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाची 'स्थापना केली.

आपल्या शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या द्वारे त्यांनी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील हजारो युवक युवतींना रोजगाराची नवीन संधी मिळून दिलेली आहे. दीनदलित, गरीब शेतकरी, शेतमजुरांच्या मुला मुलींना नोकरीची संधी मिळाल्यामुळे बेरोजगारीवर मात करता आली.

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील गरीब, दिन दलित, शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नासाठी सतत आवाज उठवणारे प्रभावी कुशल नेतृत्व म्हणजेच मा. आमदार भीमरावजी धोंडे होय. शेतकऱ्यांच्या विकासासाठी बीड जिल्ह्यातील आष्टी सारख्या दुष्काळी भागात कृषी प्रदर्शन भरवणारे कुशल नेतृत्व म्हणजेच मा. आमदार भीमरावजी धोंडे होय म्हणूनच त्यांना शेतकऱ्यांचे नेते म्हणून ओळखले जाते. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील शेतकऱ्यांना शेतीविषयक अधिक माहिती मिळविण्यासाठी त्यांनी दुसर्यांदा २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीमध्ये आष्टी येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाच्या समोर कृषी प्रदर्शन आयोजित केलेले आहे

शेतकऱ्यांच्या मुला मुलीने उच्च शिक्षण घेऊन यूपीएससी व एमपीएससी मध्ये आपले नाव लौकिक करावे म्हणून त्यांना प्रेरणा देण्यासाठी त्यांनी ११ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केलेले आहे. आष्टी पाटोदा शिरूर या भागातील गरीब शेतकऱ्यांच्या मुला मुलीने उच्चपदस्थ अधिकारी व्हावे, आपल्या आई-वडिलांची सेवा करावी व समाजाची सेवा करावी अशी त्यांची मनोभावना कायम असते म्हणूनच त्यांनी उच्च शिक्षणाचे केंद्रबिंदू आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात निर्माण करून शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली करून ठेवलेली आहेत.

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील गरीब, दिन दलित, शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नासाठी सतत आवाज उठवणारे प्रभावी कुशल नेतृत्व म्हणजेच मा. आमदार भीमरावजी धोंडे होय. शेतकऱ्यांच्या विकासासाठी बीड जिल्ह्यातील आष्टी सारख्या दुष्काळी भागात कृषी प्रदर्शन भरवणारे कुशल नेतृत्व म्हणजेच मा. आमदार भीमरावजी धोंडे होय म्हणूनच त्यांना शेतकऱ्यांचे नेते म्हणून ओळखले जाते. आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील शेतकऱ्यांना शेतीविषयक अधिक माहिती मिळविण्यासाठी त्यांनी यावर्षी २९ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीमध्ये आष्टी येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाच्या समोर वर्ष दुसरे कृषी प्रदर्शन आयोजित केलेले आहे तरी सर्व शेतकरी बांधवांनी या कृषी प्रदर्शनाचा लाभ घ्यावा.

**प्रा.सुनील बाळकृष्ण भोज**
(पंडित जवाहलाल नेहरू
उच्च माध्यमिक विद्यालय आष्टी)

# ऐन गणेशोत्सवात आचारसंहिता?

## विधानसभा निडणूकीची प्रशासनाकडून तयारी सुरु

**मुंबई । प्रतिनिधी**

**मागील काही दिवसांपासून राज्यात विधानसभा निवडणूकीचा माहोल बनविण्याचा प्रयत्न सत्ताधारी आणि विरोधकांकडून सुरु झालेला आहे. सत्ताधारी महायुतीतील एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपाकडून सध्या समाजातील विविध समाजघटकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न चालविला आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेसने लोकसभा निवडणूकीसाठी जाहिरनाम्यातील अनेक घोषणा थोड्याशा बदल करत जाहिर करण्याचा सपाटा लावला आहे. तर दुसऱ्या बाजूला विरोधकांकडून भाजपाकडून सरकारी यंत्रणांचा गैरवापर कसा करण्यात येत आहे यावरून आणि हिंदूत्ववादी राजकारणामुळे निर्माण होत असलेल्या राजकीय आणि सामाजिक परिस्थिवरून सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे.**



राज्यातील विद्यमान विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. तर हरियाणा विधानसभेची मुदत ३ नोव्हेंबर रोजी संपणार असून झारखंड विधानसभेची ५ जानेवारी रोजी संपणार आहे. याशिवाय जम्मू काश्मीर राज्यातही विधानसभेच्या निवडणूका घेण्याचा प्रयत्न केंद्रीय निवडणूक आयोगाचा प्रयत्न राहणार आहे. त्यामुळे या चारही राज्यातील निवडणूका एकत्रित घेण्याचा मानस निवडणूक आयोगाचा आहे. सप्टेंबर महिन्यापासून संपूर्ण देशभरात सण-उत्सव सुरू होतात. त्यामुळे या सण-उत्सवाच्या काळात निवडणूका घेणे अडचणीचे ठरू शकते. तरीही केंद्रीय निवडणूक आयोगाकडून ऐन गणेशोत्सावाच्या काळात निवडणूकीची आचारसंहिता लागू करण्याचा विचार आहे. त्यास राज्य सरकारकडूनही हिरवा कंदील दाखविला आहे. विशेषतः पाच दिवसांचे किंवा १० दिवसांचे गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर लगेचच आचारसंहिता जाहिर करण्याचा आयोगाचा विचार असल्याचे सांगण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या काळात आचार संहिता जाहिर केल्यानंतर घटनात्मक तरतूदीनुसार तर ४५ दिवसांचा कालावधी सर्वच राजकिय पक्षांना प्रचारासाठी देणे आवश्यक आहे, तसेच विद्यमान विधानसभेची मुदत संपण्यापूर्वी नवी विधानसभा अस्तित्वात येणे आवश्यक आहे. त्यामुळे २६ नोव्हेंबर २०२४ पूर्वी राज्यात नवी विधानसभा अस्तिवात येऊ शकेल आणि नवे सरकारही स्थापन करता येऊ शकेल. त्यामुळेच गणेशोस्तव काळात किंवा संपल्यानंतर लगेच आचारसंहिता जाहिर करणे क्रमप्राप्त आहे. दरम्यान, दिवाळीपूर्वी विधानसभा निवडणूक मतदानाची प्रक्रिया पूर्ण पाडली जाण्याची शक्यता असून दिवाळीनंतर राज्यात नवे सरकार स्थानापन्न झालेले असण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे.

# अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम

जालना । प्रतिनिधी

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त युवानेते अक्षयभैय्या गोरंट्याल यांच्या संकल्पनेतून शहरातील छाईपुरा येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. युवा नेते अक्षय गोरंटयाल यांच्या प्रमुख उपस्थितीत मोफत ॲक्युप्रेशर मशिन्सव्दारे तपासणी, रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. तर पांजरापोळ गौशाळा येथे गौसेवा, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांना नागरिकांनी देखील उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



यावेळी बोलतांना युवा नेते अक्षय गोरंटयाल म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी सातत्याने गोर गरीब आणि वंचित असलेल्या लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून जनजागृती करत लोकचळवळ उभी केली. अण्णाभाऊंचे कार्य निश्चितच प्रेरणादायी असून त्यांच्या या कार्याला पुढे नेण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी करावा अशी अपेक्षा अक्षय गोरंटयाल यांनी येथे बोलतांना व्यक्त केली. याप्रसंगी सय्यद मुस्ताक, शिवा भुरेवाल, गोपाल चित्राल, रमेश साळवे, लालू भिसे, राहुल तुपसुंदर, डॉ.सचिन राठोड, बुरान शेख, राहुल ससाने, गणेश खंदारे, सुमित वानखडे, कुशाल खंदारे, अभिषेक खंदारे, रुपेश साळवे, सुनील ढक्का, निखिल लोखंडे,आदित्य तांबे, शुभम ठोकर, गणेश घोडे, राकेश साळवे, सचिन ससाने, सोनू घोडे, रोहन वानखडे, अलोक तुपसुंदर, सोनू घोडो, संदीप औरंगे, समीर अँथोनी आदींची उपस्थिती होती.

## पान १वरून...

### मराठवाड्यातील

मागील काही दिवसात झालेल्या पावसाने धरणांच्या जलसाठ्यात काही अंशी वाढ झाल्याचे जलसंपदा विभागाने सांगितले. नाशिकच्या पाच धरणांमधून सध्या विसर्ग सुरू असल्याने जायकवाडीतील धरण साठ्यात आता वाढ होणार आहे. मराठवाड्यातील सर्वाधिक क्षमतेचे असणारे जायकवाडी धरण मागील काही दिवसात केवळ चार ते पाच टक्क्यांवर होते. गेल्या काही दिवसात झालेल्या पावसाने हा साठा आता वाढला आहे. जलसंपदा विभागाने दिलेल्या माहितीनुसार जायकवाडी धरण १०.३५ टक्क्यांनी भरले आहे. मराठवाड्यातील इतर धरणांमध्ये पाणीसाठ्यात हळूहळू वाढ होतानाचे चित्र आहे. या धरणसाठ्यात हळूहळू वाढ होत असली तरी सिंचनासह, शेती आणि पिण्यास किती दिवस हे पाणी पुरेल याबाबत आताच सांगता येणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

------------

### भेसळयुक्त दुधाचा भांडाफोड; १३

करणारे सुध्दा मोठ्या प्रमाणात आहेत. आष्टी तालुक्यात कडा येथील टाकळी आमिया रोडवरील एका पत्र्याच्या शेडमध्ये भेसळीचे दुध तयार करण्यात येत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार तीन दिवसापासून तीन जिल्ह्यातील पथकाने मोठी गोपनियता ठेवत रविवारी पहाटे ही कारवाई केली. यापुर्वी सुध्दा आष्टी तालुक्यात भेसळयुक्त दुधाचा भांडाफोड करण्यात आलेला आहे. बीड-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावरील कडा येथे टाकळी रोडलगत अंबादास चौधरी यांच्या मालकीचे साईदत्त एंटरप्रायजेस नावाचे दुकानाच्या जवळच पत्र्याचे शेडमध्ये असलेल्या गोदामात भेसळयुक्त दुध तयार करण्यात येत होते. या ठिकाणी दूध तयार करण्यासाठी १३३६८ किलो पावडरचा साठा जप्त करण्यात आला. हे काम बऱ्याच दिवसापासून सुरू असल्याचे धाड टाकताना लक्षात आले. यावेळी एकास ताब्यात घेण्यात आले असून अंबादास पांडूरंग चौधरी यांच्यासह इतरांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे भेसळयुक्त दुध तयार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. ही कारवाई पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनात, तसेच छत्रपती संभाजी नगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे आणि नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गायकवाड यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या आदेशाने करण्यात आली. या कारवाईत अन्न सुरक्षा अधिकारी संदिप देवरे, अनुराधा भोसले, सहाय्यक आयुक्त कांबळे, आष्टीचे पोलिस निरीक्षक विक्रांत हिंगे, सहाय्यक पोलिस निरीक्षक बिजय नरवाडे, स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक कृष्णा शिंदे, पोलिस हवालदार बबुशा कोळे, प्रविण क्षीरसागर, विकास जाधव, मजरुद्दीन सय्यद, सचिन गायकवाड, जिजाबाई आरेकर, दिपक भोजे, सचिन पवळ, अर्चना आरडे आदिंनी सहभाग घेतला.

-------------

### ओबीसी बहुजन पार्टी

पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी पुढे बोलताना मुंडे म्हणाले, मराठा समाजाला राज्य सरकारने १० टक्के आरक्षण दिले आहे. ते आरक्षण कोर्टात टिकवण्याची जबाबदारी सरकारची आहे. आम्हीही त्यांना वेळप्रसंगी साथ देऊ, मात्र मनोज जरांगे पाटील यांची ओबीसीमधून आरक्षण घेण्याची जिद्द चुकीची आहे. आम्ही तसे कधीच होऊ देणार नाही, शेवटच्या श्वासापर्यंत आम्ही ओबीसी आरक्षणाचे संरक्षण करणार आहोत, असेही मुंडे म्हणाले. ओबीसी समाजाच्या हितासाठी आम्ही राज्यातील २०० जागा लढवणार असून बीड जिल्ह्यातील सर्वच ६ जागांवर उमेदवार देणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. लोकसभेला झालेल्या चुका विधानसभा निवडणुकीत होऊ नये याची आम्ही काळजी घेऊ असेही ते म्हणाले. यावेळी ओबीसी नेते नितीन जायभाये, यशवंत गायके, चंद्रकांत सानप, गोविंद वनवे, बंडू बडे आदि उपस्थित होते.

**परळीतही उमेदवार देणार**

बीड जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदार संघात ओबीसी बहुजन पार्टी निवडणुक लढवणार असून परळी मतदार संघातही आम्ही तगडा उमेदवार देणार असल्याचे प्रा. टि.पी. मुंडे यांनी जाहीर केले. त्यामुळे परळीत ओबीसीकडून पालकमंत्री धनंजय मुंडे यांना आव्हान देणार असल्याचे दिसते.

---------

### एससी, एसटींना क्रिमीलेयर

परंतु, त्यांचे दिवंगत वडील रा सु गवई राज्यसभेत खासदार असताना ते न्यायाधीश झाले. त्यांचे दिवंगत वडील हे १९६४ ते २०११ या कालावधीत ३ वेगवेगळ्या राज्यांचे राज्यपाल होते. तसेच ते लोकसभा आणि राज्यसभेचे खासदार, महाराष्ट्रात विधान परिषदेचे सभापती, आमदार होते अशी आठवणही यावेळी न्यायाधीश बी आर गवई यांना त्यांनी करून दिली. प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचे आरक्षण धोरण हे आर्थिक विकासाचे धोरण नसून सामाजिक न्यायाचे हत्यार आहे. दलित प्रशासनाचा भाग नव्हते आणि त्यांना सैन्यातही भरती करण्यात आले नव्हते. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी न्यायीक धोरण म्हणजे अत्याचारितांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी धोरण आखणे हे असते असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

------------

### श्रीक्षेत्र अरण तीर्थक्षेत्र विकासासाठी

शिरस्कार, ॲड. मंगेश ससाने, ॲड.सुभाष राऊत, प्रा. डॉ. सुवर्णा चव्हाण गुंड, रविकांत महाराज वसेकर, सावता महाराज वसेकर, प्रभू महाराज माळी, महामंडलेश्वर मनीषानंद महाराज, रखमाजी महाराज, केशव महाराज उखळीकर, अभिमन्यू उबाळे, लोखंडे महाराज यांच्यासह नागरिक यावेळी उपस्थित होते. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडवणीस पुढे म्हणाले की, संत सावता महाराजांनी संपूर्ण महाराष्ट्राला भक्ती मार्गावर चालण्याचा एक वेगळा विचार दिला तसेच समाजाला एकसंघ ठेवण्याचे कार्य केले. आपल्या कर्मात मग्न असलेल्या सावता महाराजांना भेटण्यासाठी पंढरपूर येथून विठूरायाची पालखी अरण येथे येते ही ही घटना खूप महत्त्वाची आहे व १२९५ मध्ये अरण येथे संत शिरोमणी सावता महाराज यांनी संजीवन समाधी घेतली. शेकडो वर्षापूर्वी सावता महाराजांनी मांडलेले विचार आजही समाजाला दिशादर्शक ठरत आहेत, असे त्यांनी सांगितले.

**भिडे वाड्याच्या कामाचे पंतप्रधानांचे हस्ते भुमिपुजन होणार**

पुणे येथील भिडे वाडा केस राज्य शासनाने जिंकलेली असून या वाड्याच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा तयार करण्यात आला असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते येथील कामाचे भूमिपूजन लवकरच करण्यात येईल अशी माहिती श्री. फडणवीस यांनी दिली.

--------------

### लढाईआधीच आ.प्रकाश सोळंके

होणार आहे. आमदार आपल्या दारी या कार्यक्रमांतर्गत आ. सोळंके यांनी रविवारी मालीपारगाव, शहाजनपुर, वाघोरा, महातपुरी, सुलतानपुर, पुरुषोत्तमपुरी या गावांच्या भेटी घेतल्या. विधानसभा रणांगणातून माघार घेतली असून यापुढे मतदारसंघाचे नेतृत्व त्यांचे पुतणे जयसिंगभैया सोळंके यांच्याकडे या मतदार संघाचे नेतृत सोपविले असल्याचे त्यांनी सोशल मीडियावर जाहीर केले आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार यांच्या गटाचे उमेदवार म्हणून जयसिंग सोळंके यांच्याकडे पाहिले जात आहे. आ. प्रकाश सोळंके यांनी या मतदारसंघाचे विधानसभेत चार वेळा प्रतिनिधित्व केले तसेच ते या मतदारसंघाच्या विकासासाठी सतत प्रयत्नशील राहिले. परंतु मराठा आरक्षण प्रश्नावर त्यांच्यावर मराठा तरुणाची असलेली नाराजी पाहता त्यांना अजित पवार यांच्याकडून उमेदवारी मिळेल की नाही याविषयी मतदार संघात संशय व्यक्त करण्यात येत होता. तसेच गेल्या काही दिवसापासून त्यांचे पुतणे जयसिंग सोळंके हे मतदार संघात फिरून विविध कार्यक्रम घेऊन विधानसभेची दावेदारी बोलून दाखवत होते परंतु दादा सहजासहजी आमदारकी सोडणार नाहीत अशी चर्चा मतदारसंघात होती परंतु त्यांनी अचानक समाज माध्यमासमोर येऊन आपण तरुणाकडे नेतृत्व देऊ इच्छित आहोत असे जाहीर करून चुलत्याकडून पुतण्याच्या नावावर शिक्कामोर्तब केले.

-----------------------

## पान ६ वरून...

### संत सावता महाराज यांची

ह.भ.प.नाणी महाराज शिंदे,भगवानराव लांडे,बुवासाहेब शिंदे,परमेश्वर राऊत,रातनभाऊ शिंदे,नारायण शिंदे, डॉ. अशोक खेत्री ,डॉ.धयतीडक दत्ता माने, नंदराज मुंडे, आलेल्या सर्व मान्यवरांचे ओबीसी नेते प्रा.वैजेनाथ शिंदे यांनी हार्दिक स्वागत केले..कार्यक्रमासाठी सर्व बहूजन बांधवांची उपस्थिती होती.

### बीड शहरात रस्ता

की त्यांना चांगले लोकप्रतिनिधी मिळाले नाहीत. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी या भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रस्ता मंजूर केल्या बद्दल महिलांनी मानले डॉ. ज्योती मेटे यांचे आभार. वर्षानुवर्ष रस्ता नसल्याने आम्हला मुलांना शाळेत पाठवण्यासाठी आणि दैनंदिन जीवनात अडचणी भेडसावत होत्या आज हा रस्ता मंजूर केल्या बद्दल या भागातील महिलांनी डॉ. ज्योती मेटे यांचे मा.नगरसेविका प्रियांका सुहास पाटील, गोपिका जाधव, संगीता ठोसर, ज्योती शिंदे, पल्लवी जाधव, रेश्मा उनवणे, तैर मॅडम, मनीषा भालेकर, हिरताई हाडे, अंबिका हाडे, यांनी आभार मानले.

### श्रावण महिन्याच्या

पोलीसांची करडी नजर असणार असून मंदिराच्या सुरक्षेसाठी एक पोलीस उपअधीक्षक, एक पोलीस निरीक्षक ,१५ सहाय्यक पोलीस निरीक्षक,८७पोलीस कर्मचारी,२१ महिला पोलीस कर्मचारी,एक दंगल नियंत्रण पथक (४० कर्मचारी), १०० होमगार्ड असा तगडा बंदोबस्त असणार आहे.

**दर्शन पास १०० रुपयात.......**

प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होय नये यासाठी वैद्यनाथ देवस्थान ट्रस्ट तर्फे दर्शनाच्या तीन रांगा असणार असून महिला, पुरुष यांच्या स्वतंत्र रांगा तर पास धरकांसाठी विशेष रांग असणार आहे हा दर्शन पास १०० रुपयात उपलब्ध होणार आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार....
सोमवार दि. ५ ऑगस्ट २०२४
३

## समरगीत स्पर्धेत परळीच्या संघाला तृतीय पारितोषिक

परळी । प्रतिनिधी

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने गटस्तरीय समरगीत स्पर्धेचे लातुर येथील कामगार कल्याण भवनात बुधवारी (दि. ३१जुलै) आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत परळीच्या समरगीत संघाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण जेष्ठ कवी योगिराज माने, कामगार कल्याण अधिकारी प्रसाद धस, शंकर जगतात, रूपाली नाईक, विजय धायगुडे, पत्रकार धीरज जंगले यांच्या उपस्थितीत झाले.

परळीच्या समरगीत संघाने कामगारांच्या कामावर आधारित श्रमानेच उध्दार हे समरगीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संघाने उत्कृष्ट सांघिक सादरीकरण केल्याने तृतीय क्रमांकांचे बक्षीस मिळविले.

या संघात सुरसंगम संगीत विद्यालय व फाऊंडेशन शाळेच्या विद्यार्थिनीं कृतिका टाक, सिया तोतला, नेतल शर्मा, श्रीजा दहातोंडे, साक्षी सावजी, नेतल दाड, सिद्धी सानप, पुजा शिंदे, आरूषी होलानी, शिवानी सलगरे, वैभवी सावजी यांचा सहभाग होता. तर पेटीवादकाची साथ संगीत शिक्षक तुकाराम जाधव यानी दिली. आणी नैतिक गिरी यांनी तबलावादन केले.

# विद्यार्थी-शिक्षक- पालक हा त्रिकोण जोडल्यानंतरच खरी शिक्षण प्रक्रिया होते : किरण कोदरकर

अंबाजोगाई प्रतिनिधी

विद्यार्थी आपले भविष्य घडविण्यासाठी महाविद्यालयात येतात, शिक्षक त्यांची ज्ञानतृष्णा भागवितात परंतु या प्रक्रियेत पालकाची निरीक्षकाची , विद्यार्थ्यांवर लक्ष देण्याची भूमिका ही महत्त्वाची आहे त्यामुळे विद्यार्थी-शिक्षक-पालक हा त्रिकोण जोडल्यानंतरच खरी शिक्षण प्रक्रिया होते असे प्रतिपादन खोलेश्वर संकुलाच्या स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह किरण कोदरकर यांनी केले. ते येथील खोलेश्वर महाविद्यालयातील इयत्ता ११ वी च्या पालक मेळावा प्रसंगी बोलत होते . यावेळी व्यासपीठावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य तथा खोलेश्वर महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी , कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिगंबर मुडेगावकर, पर्यवेक्षक आनंद पाठक ,शिक्षक पालक योजनेचे प्रमुख प्रा.कालिदास चिटणीस यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना किरण कोदरकर म्हणाले की, शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आहे मात्र त्यांच्यात न्यूनगंड असल्यामुळे ते मागे राहतात अशा विद्यार्थ्यांसाठी आमच्या महाविद्यालयात विशेष प्रयत्न केले जातात. या वर्षीपासून स्पर्धा परीक्षा विभागाच्या माध्यमातून डेली प्रॅक्टिस पेपर हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे त्याद्वारे अगदी नाममात्र शुल्कात महाविद्यालयात नीट ,सीईटी, पोलीस भरती, सैन्य भरती, तलाठी भरती इत्यादी स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन सुरू केले आहे. यात सहभागी होण्यासाठी पालकांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करावे असे आवाहन त्यांनी केले.



यावेळी बोलताना राम कुलकर्णी म्हणाले की, विद्यार्थी महाविद्यालयात जातात का? तासिकांना उपस्थित राहतात का? नियमित अभ्यास करतात का? त्यांची प्रगती कशी आहे? यावर पालकांनी लक्ष ठेवणे गरजेचे आहे. आमचे महाविद्यालय सांस्कृतिक व परंपरा जपणारे महाविद्यालय असून येथे फक्त पुस्तकी शिक्षणाचे नाही तर नैतिक शिक्षणाचे धडे ही दिले जातात तसेच पालकांनी व विद्यार्थ्यांनी मोबाईलचा कमी व योग्य वापर करावा असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य मुकुंद देवर्षी म्हणाले की, आम्ही आमच्या संस्थेत शाळा, महाविद्यालयांना संस्कार केंद्र असे म्हणतो . कारण येथे आम्ही ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांवर संस्कार देखील करतो. त्यांच्यातील गुणांचा व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून एक सुजाण नागरिक म्हणून समाजात प्रस्थापित करण्याची भूमिका ही संस्कार केंद्र निभावते आहे. त्यात पालकांनी आपली भूमिका बजावण्याची आवश्यकता आहे .यासाठी पालकांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासाकडे लक्ष पुरवून घरातील वातावरण चांगले ठेवले पाहिजे .तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी पालकांनी प्राध्यापकांच्या संपर्कात राहिले पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले. प्रस्ताविकात उपप्राचार्य डॉ.दिगंबर मुडेगावकर म्हणाले की, शिक्षक-विद्यार्थी-पालक हे तिन्ही घटक शिक्षण प्रक्रियेत महत्त्वाचे आहेत.त्यामुळे विद्यार्थ्यांचा विकास कसा आहे हे जाणून घेण्यासाठी तसेच महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या भौतिक,शैक्षणिक सुविधांची माहिती तुम्हाला मिळावी या दृष्टिकोनातून या पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे असे त्यांनी सांगितले. या मेळाव्याच्या दुसऱ्या सत्रात प्रा.प्रसन्न जोशी यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची ओळख पीपीटी प्रेझेंटेशन द्वारे करून दिली तर प्रा. अनुपमा जाधव व प्रा. अंजली देशमुख यांनी पालकांसमोर अध्यापनाचे प्रात्यक्षिक दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मोहिनी वेडे यांनी केले तर आभार प्रा. कालिदास चिटणीस यांनी मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. शैलेश पुराणिक व संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. या मेळाव्यासाठी ८० पालकांची उपस्थिती होती.



**माजलगाव:- शेतकरी कामगार पक्षाच्या केंद्रीय कार्यकारणीच्या सदस्यपदी भाई ड.नारायण गोले पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना भाई मुंजा पांचाळ, भाई विष्णू शेळके, परमेश्वर डाके, राजाभाऊ आव्हाड, अशोक सोळंके, अर्जुन तात्या सोळंके, विनायक काठेवाडे, चेअरमन प्रदीप सोळंके, नुमनभाई चाऊस, राजाराम जमजाळ, परमेश्वर पांचाळ आमसुले आदींनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.**

## अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमांचे आयोजन

जालना । प्रतिनीधी

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त युवानेते अक्षयभैय्या गोरंट्याल यांच्या संकल्पनेतून शहरातील छाईपुरा येथे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. युवा नेते अक्षय गोरंटयाल यांच्या प्रमुख उपस्थितीत मोफत अॅक्युप्रेशर मशिन्सव्दारे तपासणी, रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. तर पांजरापोळ गौशाळा येथे गौसेवा, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांना नागरिकांनी देखील उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी बोलतांना युवा नेते अक्षय



गोरंटयाल म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी सातत्याने गोर गरीब आणि वंचित असलेल्या लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून जनजागृती करत लोकचळवळ उभी केली. अण्णाभाऊंचे कार्य निश्चितच प्रेरणादायी असून त्यांच्या या कार्याला पुढे नेण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी करावा अशी अपेक्षा अक्षय गोरंटयाल यांनी येथे बोलतांना व्यक्त केली.

याप्रसंगी सय्यद मुस्ताक, शिवा भुरेवाल, गोपाल चित्राल, रमेश साळवे, लालू भिसे, राहुल तुपसुंदर, डॉ.सचिन राठोड, बुरान शेख, राहुल ससाने, गणेश खंदारे, सुमित वानखडे, कुशाल खंदारे, अभिषेक खंदारे, रुपेश साळवे, सुनील ढक्का, निखिल लोखंडे,आदित्य तांबे, शुभम ठोकर, गणेश घोडे, राकेश साळवे, सचिन ससाने, सोनू घोडे, रोहन वानखडे, अलोक तुपसुंदर, सोनू घोडो, संदीप औरंगे, समीर अँथोनी आदींची उपस्थिती होती.

## अंबड नूतन तहसीलदार पदी विजय चव्हाण

अंबड । प्रतिनिधी

अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची बीड येथे बदली झाली असून त्यांच्या जागी छत्रपती संभाजीनगर इथून विजय चव्हाण हे येणार असून आज सोमवार रोजी अंबड तहसीलदार पदाचा पदभार घेणार आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अंबड तालुक्यात वाळू माफ वर धडाकेबाज कारवाई करून महाराष्ट्र शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मध्ये वाढ करून दिली आहे. वाळू माफिया वर त्यांची कारवाई गोपनीय पद्धतीने कारवाई करीत होते.

## रोटरी क्लब ऑफ पदग्रहण समारंभ अंबड येथे उत्साहात संपन्न

अंबड । प्रतिनिधी

अंबड रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा ३० जुलै रोजी अंबड येथेसंपन्न झाला या पदग्रहण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे माजी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेश टोपे, प्रांतपाल डॉ सुरेश साबू ,हे या ठिकाणी प्रमुख पाहुणे म्हणून होते प्रमुख उपस्थिती म्हणून रोटरी क्लब जालना चे डिस्टिक गव्हर्नर मा पंकज पाटणी यांची उपस्थिती होती. रोटरी क्लबचे मागील अध्यक्ष रो. राजकमल करवा यांनी मीटिंग कॉल्ड ऑर्डर करून सुरुवात केली नंतर त्यांनी रोटरीचा पदभार नूतन अध्यक्ष डॉ लक्ष्मण सावंत यांना सुपूर्द केला राजकमल करवा यांनी यांनी मागील वर्षी केलेल्या कामाचा आढावा सांगितला त्यानंतर सेक्रेटरी रो विनोद कुलकर्णी यांनी सचिव पदाची सूत्रे नूतन सेक्रेटरी डॉ केशव मुरकुटे यांच्याकडे सुपूर्द केले नूतन अध्यक्ष डॉ लक्ष्मण सावंत यांनी यावर्षी रोटरी काय करणार आहे याचा लेखाजोखा मांडला आरोग्य शिबीर,डेंटल तपासणी, नेत्र तपासणी, महिलांची कॅन्सर पूर्व तपासणी, पोलिओ उच्चाटन यासाठी जनजागृती, शिशु किट वाटप, एसटी स्टँड पाण्याची व्यवस्था, एक हजारो वृक्षारोपण,अंबड व परिसरातील विविध शाळांना गरीब मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप, प्लास्टिक मुक्ती जनजागृती, डायबिटीक कॅम्प, ॲनिमिया तपासणी इत्यादी त्यानंतर रो प्रांतपाल



डॉक्टर सुरेश साबू यांनी मागील अध्यक्ष व नूतन अध्यक्षांना कामासंदर्भात मार्गदर्शन पण केले, यावेळी सुरेश साबू यांनी बोलत असताना चांगल्या प्रकारचे उदाहरणे देऊन समाजसेवा करण्यासाठी आपल्याला खूप मोठ्या प्रमाणामध्ये वाव आहेत आपण ती केली पाहिजे आपण समाजाचे देणे लागतो यासाठी आपण समाजासाठी काहीतरी केले पाहिजे हे एका उदाहरणांमधून त्यांनी लोकांना समजावून सांगितले.

यावेळी बोलताना राजेश टोपे यांनी माजी अध्यक्ष राजकमल यांना केलेल्या कामाचे कौतुक करून नूतन अध्यक्ष व सेक्रेटरी व सर्व कमिटीला यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी काही नवीन सभासदांनी सुद्धा रोटरी परिवारामध्ये मान्यवरांचे उपस्थिती सभासदत व स्वीकारले त्यामध्ये खालील सभासदा आहेत डॉ रमेशदुधाळ, डॉ श्रीकांत पायमोडे ,डॉ दत्तप्रसाद बंडगर,गणेश बोबडे,बालासाहेब हमने,भगवान रेगुडे ,किशोर मुर्तडकर

रोटरी पदग्रहण समारंभाच्या कार्यक्रमाला विशेष जालना येथून रोटरी क्लबचे मान्यवर पदाधिकारी मा डॉ खंडेलवाल, गौरव करवा, डॉ गादिया मॅडम, डॉ साबू मॅडम, महेश माळी, सागर दक्षिनी,आले होते, रोटरी क्लब ऑफ अंबडचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यामध्ये , डॉ रोहित भाला, अमर लाहोटी जगदीश चरखा, संतोष शिनगारे, संजय विंचुरे, अभिषेक गिल्डा, ऋषी गिल्डा,सतीश देशपांडे, डॉ कल्पना पाईकराव,डॉ शिनगारे मॅडम, गीता सावंत, शिवाजी बजाज मारुती घुगे डॉ पटेकर डॉ जहागीरदार, एडवोकेट पाटील ,सुराशे सर, वखरे ठाकूर रवी, मुसळे,, खोमणे अंबादास, ,डॉ शिनगारे,व सन्माननीय पत्रकार बांधव उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री राजेश टोपे यांनी सुद्धा अंबड रोटरी क्लब चे सभासदत्व प्रांतपाल रो डॉ साबू सरांच्या हस्ते स्वीकारले. अध्यक्ष डॉ लक्ष्मण सावंत व सचिव डॉ केशव मुरकुटे यांनी सूत्रे हाती घेतली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरुषोत्तम सोमानी यांनी केले . आभार ऋषी गिल्डा यांन , डॉ केशव मुरकुटे यांनी मानले.

## सिओ शांताराम गोसावी यांना मातृशोक

जालना । प्रतिनिधी

तिर्थपुरी (ता.घनसावंगी) नगरपंचायतीचे मुख्याधिकारी शांताराम रामभाऊ गोसावी यांची आई



सुगंधाबाई रामभाऊ गोसावी यांचे ४ ऑगस्ट रोजी नाशिक येथे निधन झाले.५ ऑगस्ट रोजी शिवधाम विठ्ठल मंदिर जवळ धांदरफळ बु. ता. संगमनेर जि. अहमदनगर येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. सुंगधाबाई गोसावी यांच्या पश्चात २ मुले विठ्ठल रामभाऊ गोसावी व शांताराम रामभाऊ गोसावी हे आहेत.

## एम.पी.निमजे सेवानिवृत्त



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील श्रीमती गोदावरी कुंकूलोळ कन्या नुतन विद्यालयातील जेष्ठ शिक्षिका एम.पी.निमजे ह्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्या.त्यांचा सेवागौरव विद्यालयात संपन्न झाला. निमजे यांनी विद्यार्थिनींना तळमळीने अध्यापन केले असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या सेवेचा यथोचित सपत्नीक गौरव मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

निमजे यांनीही सर्वांना भेटवस्तु देऊन स्वागत केले. या कार्यक्रमास निमजे परिवारातील सदस्य, शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## संतोषसिंग रहेकवाल यांची सुभेदार मेजर पदी पदोन्नती

किल्ले धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर चे सुपुत्र संतोषसिंग भारतसिंग रहेकवाल यांची नुकतीच सुभेदार मेजर पदी पदोन्नती झाली आहे. या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. संतोषसिंग भारतसिंग रहेकवाल हे आदर्श क्रीडा शिक्षक भारतसिंग जयपालसिंह रहेकवाल यांचे सुपुत्र असून त्यांचे प्राथमिक शिक्षण जि.प.शाळा वकीलवाडी केज येथे झालेले आसून माध्यमिक शिक्षण जिल्हा परिषद माध्यमिक शाळा केज येथे झालेले होते.

पुढे त्यांची भारतीय सैन्य अंतर्गत बॉईज स्पोर्ट्स कंपनी पुणे अंतर्गत रोइंग नौकायन क्रीडा प्रकारासाठी निवड झाली.या



क्रीडा प्रकारात त्यांना पाच वेळा राष्ट्रीय स्पर्धेत पारितोषिक मिळाले व दोन वेळा आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. नंतर क्रीडा कोठयातून भारतीय सैन्यदलात त्यांची भरती झाली.२५ वर्ष सेवा केल्यानंतर त्यांची आता सुभेदार मेजर पदी पदोन्नती झाली आहे.

पदोन्नती बाबतचे सन्मानाचे अशोक स्तंभ चिन्ह कर्नल विशाल पाठक साहेब व वडील भारतसिंग रहेकवाल यांच्या शुभ हस्ते व आई सौ.शकुंतला व पत्नी सौ.पुजा यांच्या सह कुटुंबीयांचे समक्ष लावून बॉम्बे इंजिनीअरींग ग्रूप पुणे येथे त्यांना सन्मानित करण्यात आले. पदोन्नती नंतर माध्यमांशी बोलताना सुभेदार मेजर संतोषसिंग रहेकवाल म्हणाले की, मला माझे वडील आदर्श क्रीडा शिक्षक भारतसिंग रहेकवाल,प्रा.हनुमंत भोसले,प्रा.ईश्वर मुंडे यांचे मार्गदर्शन लाभलेले होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असून शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन व विद्यार्थ्यांनी प्रमाणीकपणे प्रयत्न केले तर ग्रामीण विद्यार्थी नक्कीच सर्वच क्षेत्रात यशस्वी होतात.

## उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार यांच्या वाढदिवस उत्साहात साजरा



परळी । प्रतिनिधी

औष्णिक विद्युत केंद्राचे प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा केक कापून, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी दि ४ ऑगस्ट रोजी उपकार्यकारी अभियंता गजेंद्र धनोरीया, उपकार्यकारी अभियंता इमरान मणियार, भगवान साकसमुद्रे, यशोधन अवचार, गणेश गित्ते, आयान मणियार, काशिनाथ भंडारे आदि दिसत आहेत.

## केज मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार इंजि एन डी शिंदे यांच्या मतदारसंघातील विविध गावांना प्रत्यक्ष भेटी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या केज मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार इंजि एन डी शिंदे यांनी केज मतदारसंघात असलेल्या अंबाजोगाई व केज तालुक्यातील विविध गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तथा तेथील प्रतिष्ठित नागरिक त्यासोबतच तेथील ग्रामस्थांच्या समोरासमोर प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. स्वतःची ओळख करून देत आपल्या संभाव्य उमेदवारीचे पत्रक त्या त्या ठिकाणच्या ग्रामस्थांना दिले.



प्रत्यक्ष भेट दिलेल्या गावांमध्ये अंबाजोगाई तालुक्यातील सनगाव, उमराई, तसेच केज तालुक्यातील मुळेगाव लाडे वडगाव , होळ, कळम्बअंबा या व यासह विविध गावांना व तेथील ग्रामस्थांना समोरासमोर भेटी दिल्या. यावेळी ग्रामस्थांनी देखील इंजि एन डी शिंदे यांचे उत्स्फूर्त असे स्वागत करून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. मी इंजि एन डी शिंदे आपल्या गावाबरोबरच संपूर्ण मतदारसंघाचा विकास करण्यासाठी तथा येथील मूलभूत प्रश्नांची उकल करण्यासाठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवण्याची इच्छा शिंदे यांनी व्यक्त केली. यावेळी ग्रामस्थांनी देखील इंजि एन डी शिंदे यांचे म्हणणे ऐकून घेतले. या भेटीदरम्यान शिंदे यांनी ग्रामस्थांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी त्या त्या गावातील युवक, महिला तसेच त्या परिसरातील प्रतिष्ठित व जेष्ठ नागरिक यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. तेथील नागरिकांकडुन देखील इंजि एन डी शिंदे यांना सहकार्य करण्याचे आश्वासन मिळाले.

## २५ वर्ष केलेल्या फसवणुकीचा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत घेणार हिशोब -सतीश घाटगे

अंबड । प्रतिनिधी

विद्यमान आमदाराने राजकीय स्वार्थासाठी प्रत्येकवेळी आम्हालाखोटी आश्वासने देऊन आणि खोटी स्वप्ने दाखवूनफसवणूक केली. येणाऱ्या निवडणुकीत २५ वर्षात केलेल्या फसवणुकीचा येणाऱ्या निवडणुकीतआम्ही घेणार हिशोब, अशा शब्दात घनसावंगी तालुक्यातील सरफगव्हाण येथील जनतेनी सतीश घाटगेयांच्या नेतृत्वाखाली झालेल्या शाखा स्थापनेत हुंकार भरला. शनिवारी सरफगव्हाण येथे भाजपची१६१ वी शाखा मोठ्या उत्साहात झाली. या गावातील जनतेनी भर सभेत प्रस्थापित आमदारांनीकेलेली फसवणूक सतीश



घाटगे पाटील यांना बोलून दाखवली. या जनतेमध्ये प्रस्थापिताविरोधातप्रचंड असंतोष आणि रोष दिसून आला. परिवर्तनासाठी गावकऱ्यांनी दोन्ही हात उंचावूनसतीश घाटगे पाटील यांना साथ देण्याचा विश्वास दिला. जनतेचा हा विश्वास येणाऱ्या काळातसार्थ ठरेल, असा विश्वास यावेळी सतीश घाटगे यांनी दिल. याप्रसंगी असंख्य युवकांनी सतीश घाटगे यांच्या हस्ते भाजपात जाहीर प्रवेशकेला. सर्व युवांचे आणि शाखेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष मार्गदर्शक व सदस्यांचे सतीश घाटगे यांनी पक्षात स्वागत करून पुढील वाटचालीसशुभेच्छा दिल्या. तसेच त्यांना प्रत्येक अडचणीत सोबत उभा राहील, असा शब्द दिला. या कार्यक्रमास अर्चनाताई सोसे, दत्ता टापरे, बाबासाहेब हरबक, माधव टेहळे,विठ्ठल देशमुख, भगवान तौर, नानाभाऊवायाळ, विष्णुपंत जाधव, किरण भुतेकर, जाहीर पटेल, कृष्णा कौलांगे, अर्जुन बिटले,शंकर भालेकर, किरण गुडेकर, बाबासाहेब जाधव, राजू पवार, कैलास मुळे, भानुदास बर्डे,शिवाजी मुळे, सचिन पाटोळे, हरिचंद्र जाधव, सुदाम असोले, भानुदास धनवडे, लक्ष्मन' थोरात,लक्ष्मण गोरे, अंकुश तांगडे, शेषराव बोर्डे, भीमाशंकर काळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पूरस्थितीमुळं ऊसासह सोयाबीन भुईमूग पिकाला मोठा फटका

## पुरग्रस्तांना कोणतेही निकष न लावता मदत करा, राजू शेट्टींची मंत्री मुश्रीफांकडे मागणी

सध्या राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. अनेक ठिकाणी जोरदार पावसामुळं पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळं शेती पिकांनी देखील मोठा फटका बसला आहे. अशातच सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचं देखील मोठं नुकसान झालं आहे. गेल्या १५ दिवसापासून सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पुर परिस्थिती गंभीर झाली आहे. पावसाचा जोर कमी होवूनही नदीपात्रातून बाहेर पडलेले पाणी अजूनही ओसरलेले नाही. यामुळे ऊस , सोयाबीन , भुईमूग , भाजीपाला यासह इतर पिकांचे पुर्णत: नुकसान झाले आहे. यामुळे राज्य सरकारने पुरग्रस्तांना २०१९ च्या धर्तीवर कोणतेही निकष न लावता मदत करावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे केलीय. या आशयाचे निवदेशन देखील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीनं देण्यात आलं आहे.




पूरस्थितीकडे केंद्र व राज्य सरकारचे दुर्लक्ष

सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पूरस्थिती नैसर्गिक आपत्ती बरोबर मानवनिर्मीत संकटामुळे निर्माण झालेली असल्याने केंद्र व राज्य सरकारने दुर्लक्ष केले आहे. याबाबत वारंवार निवेदन देवून २०१९ पासून सातत्याने केंद्र व राज्य सरकारला कर्नाटक राज्यातील मांजरी येथील कृष्णा नदीवरील पुलाचा भराव तसेच पुणे -बेंगलोर महामार्गावरील पुलाचा भराव, यासह इतर पुलावरील भरावामुळे ही परिस्थती निर्माण झालेली असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. सदर ठिकाणी तातडीने पिलरची उभारणी करण्याची मागणी करूनही केंद्र व राज्य सरकारने जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले आहे. पावसाचा जोर कमी होवूनही व अलमट्टी व हिप्परगी धरणातून विसर्ग सुरू असूनही शिरोळ ,हातकंणगले व करवीर तालुक्यातील पाणी दररोज दोन ते तीन इंचाने कमी होवू लागले आहे. सदरची परिस्थती अशीच राहिल्याने शेतकऱ्यांची राखरांगोळी झाली आहे. यामुळं राज्य व केंद्र सरकारने तातडीने याबाबत कार्यवाही करण्याची मागणी केली.

हेक्टरी १ लाख रुपये सरसकट मदत करावी

२०21 च्या महापूरातही कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. यावेळी उध्दव ठाकरे मुख्यमंत्री असताना महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक करून गुंठ्याला १३५ रूपयाची तुटपुंजी मदत केली होती. म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील तत्कालीन महायुती सरकारने २०१९ च्या महापुरामध्ये ज्या पध्दतीने पुरग्रस्तांना नुकसानभरपाई पोटी हेक्टरी १ लाख रुपये सरसकट मदत केलेली होती. तेच निकष लावून आताही तातडीने नुकसान भरपाई देण्याची व तसेच १५ व्या वित्त आयोग किंवा जिल्हा वार्षिक योजनेतून पुरग्रस्त गावांना यांत्रिकी बोटी देण्याची शासनाने द्यावे. मागणी यावेळी शिष्टमंडळाने केली.

# वांगे पिकातील फळ पोखरणारी आळी नियंत्रन



वांग्याचे पीक घेत असताना चांगले व्यवस्थापन करूनही अपेक्षित उत्पादन भेटत नाही. उत्पादन न निघण्याचे बरीच कारणे आहेत. त्यापैकी वांगी पिकावर येणारी कीड हे प्रमुख कारण आहे. वांगी पिकातील शेंडा व फळे पोखरणारी अळीची लागण खूप मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे किडीचा प्रधुरभाव ओळखून वेळीच उपाययोजना केल्यास कीड नियंत्रणात येऊ शकते.वांगी पिकामध्ये येणाऱ्या शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीच्या प्रादुर्भावामुळे सर्वसाधारणपणे ४० टक्क्यांपर्यंत नुकसान होते. वेळीच उपाययोजना न केल्याचे नुकसान १०० टक्क्यांपर्यंत जाऊ शकते. वांग्यावरील शेंडा व फळे पोखरणारी अळी ही कीड अंडी, अळी, कोष व प्रौढ अशा चार अवस्थांमधून आपले जीवन पूर्ण करते. त्यापैकी अळी अवस्था आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक असते. या किडीची अळी छोटी व फिक्कट गुलाबी रंगाची असते. पतंग मध्यम आकाराचा असून पुढील पंख पांढरे व त्यावर तपकिरी रंगाचे ठिपके असतात.

जीवनक्रम : या किडीची मादी एकानंतर एक अशी २५० अंडी झाडाच्या पानावर, शेंड्यावर, फुलकळयावर आणि कोवळया फळांवर घालते. अंडी गोलाकार व सफेद पिवळसर रंगाची असतात. ही अंडी ३-५ दिवसांनी उबतात व त्यातून सफेद अळी बाहेर पडते. ही अळी पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेतील शेंडा व फळधारणा वेळी फळांमध्ये नुकसान करते. ही अळी १५-२० दिवसांनी प्रौढ बनून गुलाबी रंगाची दिसते, नंतर ती शेंडा अथवा फळांमधून निघून जमिनीत अथवा पालापाचोळ्यात किंवा मुळाजवळ कोषावस्थेत जाते. आठवडाभराच्या कालावधीनंतर कोषामधून प्रौढ (पतंग) बाहेर येतो. प्रौढांचे आयुष्य ६-१० दिवसांचे असते.

नुकसान : या किडीचा प्रादुर्भाव रोप लावल्यानंतर काही आठवड्यानंतर दिसून येतो. अळी प्रथम पानाच्या देठात, कोवळ्या शेंड्यात शिरून आतील भाग खाते. या किडीचे प्रमुख लक्षण म्हणजे प्रादुर्भावग्रस्त शेंडे वाळतात. पीक फुलोऱ्यावर आल्यानंतर अळी कळी पोखरून आत शिरते, प्रादुर्भावग्रस्त फुले फळ न धरता वळून, सुकून जमिनीवर गळून पडतात. फळे आल्यानंतर ही अळी सुरवातीला छिद्र करून फळांत प्रवेश करून विष्ठेद्वारे प्रवेशद्वार बंद करते. ६. त्यामुळे बाहेरून फळ किडल्याचे लवकर लक्षात येत नाही. आतील गर खाऊन विष्ठा आतच सोडत असल्यामुळे कीडग्रस्त फळे खाण्यास अयोग्य ठरतात.

लागवडपुर्वी काळजी : उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरणी करावी, त्यामुळे किडींच्या विविध अवस्था नष्ट होतात. एकाच शेतामध्ये वर्षानुवर्षे वांग्याचे पीक घेऊ नये. जास्त प्रादुर्भाव झालेल्या शेतामध्ये पुढच्या वर्षी वांग्याचे पीक घेणे टाळावे. पिकाची योग्य प्रकारे फेरपालट करावी मागील पिकांचे अवशेष गोळा करून नष्ट करावेत. लागवडीसाठी वांग्याच्या सुधारित व शिफारशीत वाणांचा वापर करावा. या पिकाला गरजेनुसार खतमात्रा द्यावी. आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. प्रादुर्भावग्रस्त झाडाचे शेंडे व फळे तोडून अळ्यांसहीत त्यांचा नायनाट करावा. वाणांच्या शिफारशीनुसार दोन झाडांमधील व दोन ओळींतील अंतर ठेवावे. प्रकाश सापळ्यांचा उपयोग करून पतंग नष्ट करावेत. वांगी पिकामध्ये सर्वेक्षणासाठी एकरी पाच कामगंध सापळे पिकाच्या वर एक फूट उंचीवर लावावे. शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळ्यांच्या तीव्रतेची कल्पना येईल. पाच टक्के निंबोळी अर्काची किंवा (अँझाडिरेक्टीन १० हजार पीपीएम ) २.५ मि.लि. प्रतिलिटर पाणी याप्रमाणे प्रतिबंधात्मक फवारणी करावी.

१०. जैविक कीड नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा व ब्रेकॉन या परोपजीवी कीटकांच्या अंड्याचे प्रसारण करावे. वरील उपाययोजना केल्यावरही शेंडा व फळे पोखरणारी अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीची पातळी पेक्षा अधिक आढळल्यास, रासायनिक नियंत्रण याचा विचार करावा.

रासायनिक नियंत्रण : बायर सोलोमन (बीटा-साइफ्लुथ्रिन + इमिडाक्लोप्रिड ३०० ओडी) - १५ मिली. प्रोफेक्स सुपर (प्रोफेनोफोस ४०% + सायपरमेथ्रिन ४% ईसी) -३० मिली. बायर डेसिस १०० ईसी (डेल्टामेथ्रिन १०० ईसी) - १० मिली. डाऊ ॲग्रो सायन्स ट्रेसर (स्पिनोसॅड ४५% एससी) - ८ मिली. एफएमसी कोराजन (क्लोरॅनट्रानिलीप्रोल, १८.५% ) एससी - ६ मिली.

# बाजार समित्यांसाठी पुन्हा सचिव केडर

बाजार समित्यांमधील संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या सचिवांवर आता गंडांतर येणार आहे. संचालक मंडळ आणि सचिवांच्या परस्पर संमतीने होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी पणन विभागाने पुन्हा एकदा सचिवांचे पॅनेल करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. यासाठीच्या हरकती, सूचना मागविण्यात आल्या आहेत.

यापूर्वी देखील पणन मंडळाद्वारे सचिवांचे पॅनेल करण्याचा निर्णय देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजप शिवसेना युतीच्या सरकारने घेतला होता. याद्वारे काही सचिवांच्या नियुक्त्या देखील झाल्या होत्या. मात्र बाजार समित्यांच्या विरोधामुळे पॅनेल प्रक्रिया रद्द करावी लागली होती. आता पुन्हा सचिव पॅनेल नियुक्तीमुळे बाजार समित्या आणि राज्य सरकार अशा वादाची शक्यता आहे. राज्यात ३०६ बाजार समित्या असून, त्यातील केवळ ११० सचिव हे पूर्णवेळ कार्यरत आहेत. तर सुमारे २०० सचिव प्रभारी आहेत. या ३०६ बाजार समित्यांपैकी १८३ बाजार समित्यांचे उत्पन्न पाच कोटी रुपयांहून अधिक असल्याने त्यांचा 'अ' वर्गात समावेश होतो. तर त्याखालील उत्पन्न असलेल्या बाजार समित्यांचे 'ब', 'क' व 'ड' वर्गात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सचिवपदांचे दोन गटांत वर्गीकरण करावे, असा मतप्रवाह आहे. पहिल्या गटात 'अ' वर्ग बाजार समितीचे सचिव व दुसऱ्या गटात 'ब', 'क' आणि 'ड' वर्गातील बाजार समित्यांचे सचिव असतील. त्यानुसार त्यांच्या अंतर्गत बदल्या, बढती, तसेच त्यांच्या विषयीच्या तक्रारींवरही निर्णय घेतला जाणार आहे. याबाबत सहकार विभागाने एका समितीची स्थापना केली आहे. या प्रस्तावावर बाजार समित्यांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत. राज्य सरकारच्या मान्यतेनंतर पणन संचालनालयात स्वतंत्र सचिव कक्ष स्थापन करण्यात येऊन सचिवांचे नियंत्रण केले जाणार आहे. यासाठी सचिवांच्या आकृतिबंधाला राज्य सरकारची मान्यता घेतली जाणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.



# फळझाडांना द्या संतुलित खते

फळझाडांची वाढ आणि त्यावर होणारी फलधारणा जमिनीतून मिळणाऱ्या पोषक अन्नद्रव्यांवर आणि स्थानिक हवामानावर अवलंबून असते. त्यामुळे या दोन महत्वाच्या बाबीपैकी जमिनीच्या सुपिकतेकडे लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे. जमिनीच्या सुपिकतेकडे दुर्लक्ष झाल्यास झाडांची वाढ कमी होते आणि झाडे किडी व रोगास बळी पडतात.झाडांची वाढ निकोप व्हावी म्हणून योग्य मशागत, तणांचा बंदोबस्त, खतांचा संतुलित पुरवठा, सेंद्रिय पदार्थांचे आच्छादन म्हणून वापर, आच्छादनाची पिके, आंतरपिके इत्यादी मार्गांनी जमिनीची सुपिकता चांगली ठेवणे फायदेशीर ठरते. फळ झाडांना खते देण्याची योग्य वेळ : सर्वसाधारणपणे फळझाडांना जून-जुलै, सप्टेबर-ऑक्टोबर व जानेवारी - फेब्रुवारी या महिन्यात खते द्यावीत. परंतू खते देताना प्रत्येक फळझाडाचा बहार येण्याचा व फळे पक्व होण्याचा कालावधी लक्षात घेऊन खते द्यावीत. सर्वसाधारणपणे जून-जुलै महिन्यात संपूर्ण शेणखत अथवा कंपोस्ट खत, संपूर्ण स्फुरद व पालाश ची मात्रा द्यावी. नत्राची मात्रा एक ते दोन हप्त्यात विभागून द्यावी. खते देण्यापूर्वी तज्ञांचा सल्ला घ्यावा.

फळझाडांना खते देण्याची पद्धत : खताची मात्रा देताना मोठ्या विस्ताराखाली खोडापासून एक मीटर लांब ४० ते ५० से.मी. रुंद आणि १५ से. मी. खोल वर्तुळाकार चर काढावा.प्रथम चरात पालापाचोळा आणि शेणखत नंतर रासायनिक खते सर्व बाजूनी टाकावी नंतर चर मातीने बुजवावा.

आंबा : पूर्ण वाढलेल्या झाडास (१० वर्ष व अधिक) जून-जुलै महिन्यात ५० किलो शेणखत, शिफारशीत खत मात्रा (१५००:५००:५०० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) दीड किलो युरिया, तीन किलो एसएसपी व एक किलो एमओपी द्यावे.



सप्टेबर व फेब्रुवारी महिन्यात पाऊण किलो युरिया प्रत्येकी द्यावा.

चिकू : पूर्ण वाढलेल्या प्रत्येक झाडास १०० किलो शेणखत, शिफारशीत खत मात्रा (३:२:२ किलो/झाड नत्र:स्फुरद: पालाश) तीन किलो नत्र (६.५ किलो युरिया),दोन किलो स्फुरद (१२.५ किलो एसएसपी) व दोन किलो पालाश (३.५ किलो एमओपी) जुन-जुलै महिन्यात द्यावे. उर्वरित निम्मा नत्राचा हफ्ता सप्टेंबर मध्ये द्यावा.

पेरू : पूर्ण वाढलेल्या पेरूच्या झाडास ५० किलो शेणखत, शिफारशीत खत मात्रा (९००:३००:३०० ग्रॅम/झाड नत्र: स्फुरद: पालाश) म्हणजेच दोन किलो युरिया, दोन किलो एसएसपी व अर्धा किलो एमओपी द्यावे. यापैकी निम्मे नत्र (एक किलो युरिया) बहारच्या वेळी व उरलेला नत्र फलधारणेनंतर द्यावा. तर स्फुरद व पालाश एकाच हफ्त्यात बहारच्या वेळी द्यावे.

अंजीर : पूर्ण वाढलेल्या अंजिराच्या झाडास, अंजिराची झाडे सुप्तावस्थेत असताना बागेत खोल खादंणी करावी. प्रत्येक झाडास ५० किलो शेणखत, शिफारशीत खत मात्रा (९००:२५०:२७५ ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद: पालाश) दोन किलो युरिया, दीड किलो एसएसपी व एक किलो एमओपी छाटणी नंतर द्यावे. फळधारणेनुसार नत्र(युरिया ) दोन वेळा विभागून एक महिन्याच्या अंतराने द्यावे.

लिंबू : पूर्ण वाढलेल्या चार वर्षाच्या लिंबूच्या झाडास जून-जुलै महिन्यात १५ किलो शेणखत,१५ किलो निबोळीपेंड शिफारशीत खत मात्रा (६००:३००:६०० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) सुफला (१५:१५:१५) एक किलो, अर्धा किलो एमओपी द्यावे. सप्टेबर महिन्यात ३०० ग्रॅम युरिया व जानेवारी महिन्यात ३०० ग्रॅम युरिया द्यावा. वरील खतांशिवाय ५०० ग्रॅम व्हॅम+ १०० ग्रॅम पीएसबी + १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा हरजियानम+ १०० ग्रॅम ॲझोस्पिरिलम द्यावे.सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता आढळल्यास ०.५ % झिंक सल्फेट, ०.५% मॅग्नेशियम सल्फेट,०.३% फेरस सल्फेट व कॉपर सल्फेट या सूक्ष्म अन्न्द्र्व्यांची एकत्रित फवारणी करावी.

मोसंबी :पूर्ण वाढलेल्या पाच वर्षाच्या प्रत्येक झाडास २० किलो शेणखत,१५ किलो निबोली पेंड, शिफारशीत खत मात्रा ( ८००:३००:६०० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) पुढील प्रमाणे विभागून द्यावे. जानेवारी महिन्यात ७०० ग्रॅम युरिया + ९०० ग्रॅम एसएसपी, मार्च महिन्यात ७०० ग्रॅम युरिया + ९०० ग्रॅम एसएसपी, मे महिन्यात ३५० ग्रॅम युरिया + ५०० ग्रॅम एमओपी,जुलै महिन्यात २५० ग्रॅम एमओपी आणि सप्टेंबर महिन्यात २५० ग्रॅम एमओपी द्यावे. बहार घेताना याखतांशिवाय ५०० ग्रॅम व्हॅम + १०० ग्रॅम पीएसबी + १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा हरजियानम + १०० ग्रॅम ॲझोस्पिरिलम द्यावे.

डाळिंब : पूर्ण वाढलेल्या झाडास शेणखत ४० ते ५० किलो (६२५:२५०:२५० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद:पालाश) प्रती वर्ष, नत्र दोन समान हप्त्यात विभागून द्यावे.म्हणजेच बहार धरतेवेळी ७०० ग्रॅम युरिया,संपूर्ण एसएसपी १५५० ग्रॅम व एमओपी ४०० ग्रॅम उरलेले अर्धे नत्र(युरिया ७०० ग्रॅम) फळांच्या गाठी धरल्यानंतर २-३ वेळा विभागून द्यावे

नारळ : ५ ते ६ वर्षाच्या नारळाच्या झाडास ५० किलो शेणखत, शिफारशीत खत मात्रा (१०००:५००:१००० ग्रॅम/झाड नत्र:स्फुरद: पालाश) म्हणजेच दोन किलो युरिया,तीन किलो सिंगल सुपर फॉसपेट आणि साडेतीन किलो म्यूरेट ऑफ पोटॅश तीन समान हफ्त्यात द्यावे.(जून-सप्टेंबर व फेब्रुवारी) पैकी संपूर्ण शेणखत व सिंगल सुपर फॉसपेट जून महिन्यातच एकाच वेळी द्यावीत.रोपे लावल्यानंतर पहिल्या वर्षी रोपांची मुळे ३० से.मी.अंतरापर्यंत सभोवती विखरून टाकावीत आणि खुरप्याच्या सहाय्याने मातीत मिसळावी.त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी खते देताना ३० से.मी.अंतर वाढवत जावे व पाचव्या वर्षी व त्या पुढे १.५ ते १.८० मीटरपर्यंतच्या अंतराने ती पसरून टाकावीत आणि ती मातीत मिसळावी.




## महत्वाच्या घटना

१५८३ : अमेरिका सर हम्फ्रे गिल्बर्ट यांनी उत्तर अमेरिकेत पहिली इंग्रजी वसाहत स्थापन केली
१८६१ : अमेरिकन सैन्यातील चाबकाचे फटके मारण्याची शिक्षा बंद करण्यात आली.
१९१४ : ओहायो मध्ये पहिले इलेक्ट्रिक ट्रॅफिक सिगनल बसवले.
१९६२ : कन्या नक्षत्रात पहिल्या 'क्वासार' तार्याचं अस्तित्व सिद्ध करण्यात यश
१९६२ : नेल्सन मंडेला यांना तुरुंगात टाकण्यात आले. यानंतर १९९० मधे त्यांची सुटका झाली.
१९६३ : शीतयुद्ध आंशिक आण्विक चाचणी बंदी करार: अमेरिका, युनायटेड किंगडम आणि सोव्हिएत युनियनने स्वाक्षरी केली.
१९६५: पाकिस्तानी सैन्याने साध्या वेषात घुसखोरी केल्यामुळे भारत पाकिस्तान युद्धाला सुरूवात झाली.
१९७३ : मार्स ६ अंतराळयान यूएसएसआर वरून प्रक्षेपित झाले.
१९९४ : इंडियन नॅशनल सायन्स ॲकेडमी तर्फे दिला जाणारा 'होमी जहांगीर भाभा पुरस्कार' राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळेले संचालक प्रा. इरोड सुब्रमणियन राजगोपाल यांना प्रदान
१९९७ : फ्रेन्च खुल्या लॉनटेनिस स्पर्धेत मिश्र दुहेरी गटात विजेतेपद मिळवणार्या महेश भूपतीला क्रीडा खात्यातर्फे २ लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर
१९९७ : रशियाच्या दोन अंतराळवीरांना घेऊन 'सोयूझ-यू' हे अंतराळयान 'मीर' अंतराळस्थानकाकडे रवाना
२०१६ : ब्राझिलमधे रिओ-डी-जानिरो येथे ३१ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात होणार आहे.
२०१९ : भारत जम्मू आणि काश्मीर या परदेशाला राज्यचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला आणि राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये जम्मू आणि काश्मीर, व लडाख असे विभाजन करण्यात आले.
२०२० : राम मंदिर, अयोध्या सर्वोच्च न्यायालयाच्या विवादित जमिनीवर मंदिर बांधण्याच्या बाजूने निकाल दिल्यानंतर भूमिपूजन करण्यात आले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५० : फ्रेंच लघुकथाकार व लेखक गाय दी मोपासां यांचा जन्मदिन.
१८५२ : ब्रिटीश कालीन भारतातील उडीसा राज्यातील राष्ट्रवादी स्वातंत्रता सेनानी आचार्य प्यारे मोहन यांचा जन्मदिन.
१८५८ : वासुदेव वामन तथा 'वासुदेवशास्त्री' खरे इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी (मृत्यू: ११ जून १९२४)
१८९० : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार इतिहासकार, लेखक, वक्ते आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू १९६१-१९६४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू १९४८, पद्मविभूषण, मराठी शुद्धलेखन महामंडळाचे अध्यक्ष, प्राचीन मराठी इतिहास आणि मराठ्यांचा इतिहास यांचे व्यासंगी (मृत्यू: ६ आक्टोबर १९७९)
१९०१ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व मध्य प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री पं. द्वारका प्रसाद मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१५ : पद्मश्री, पद्मभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार, सन्मानित प्रख्यात हिंदी कवी व शिक्षणतज्ञ शिवमंगल सिंग 'सुमन' यांचा जन्मदिन.
१९३० : नील आर्मस्ट्राँग चंद्रावर पाऊल ठेवलेला पहिला मानव (मृत्यू: २५ ऑगस्ट २०१२)
१९३३ : विजया राजाध्यक्ष लेखिका व समीक्षिका, ७४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा
१९४७ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी वीरेन डंगवाल यांचा जन्मदिन.
१९५० : भारतीय वकील आणि राजकारणी महेंद्र कर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २०१३)
१९६९ : वेंकटेश प्रसाद जलदगती गोलंदाज
१९७२ : अकिब जावेद पाकिस्तानी जलदगती गोलंदाज
१९७५ : काजोल अभिनेत्री

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८८२ : लुई (तिसरा) फ्रान्सचा राजा (जन्म:८६३)
१८९५ : जर्मन तत्त्ववेत्ता, इतिहासकार, साम्यवादी, सामाजिक शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार आणि व्यवसायिक फ्रेडरिक एंगेल्स यांचे निधन.
१९५० : भारत रत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वतंत्रता सेनानी व आसाम राज्याचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बोरदोलोई यांचे निधन.
१९६२ : अमेरिकन अभिनेत्री मेरिलीन मन्रो यांनी गोळी झाडुन घेऊन आत्महत्या केली. (जन्म: १ जून १९२६)
१९८४ : रिचर्ड बर्टन अभिनेता (जन्म: १० नोव्हेंबर १९२५)
१९९१ : होंडा कंपनी चे स्थापक सुइचिरो होंडा यांचे निधन. (जन्म: १७ नोव्हेंबर १९०६)
१९९२ : अच्युतराव पटवर्धन स्वातंत्र्यसैनिक, ४२ च्या चळवळीतील अग्रणी नेते, भारतीय समाजवादी पक्षाचे एक संस्थापक, विचारवंत, तत्त्वचिंतक व सामाजिक कार्यकर्ते (जन्म: ५ फेब्रुवारी १९०५)
१९९७ : के. पी. आर. गोपालन स्वातंत्र्यसैनिक, कम्युनिस्ट व नक्षलवादी नेते (जन्म: )
२००० : लाला अमरनाथ भारद्वाज भारतीय क्रिकेटचे भीष्माचार्य, स्वतंत्र भारताच्या पहिल्या क्रिकेट संघाचे कर्णधार व स्वतंत्र भारताचे पहिले शतकवीर
२००१ : ज्योत्स्ना भोळे संगीत रंगभूमीला नवचैतन्य देणार्या गायिका आणि अभिनेत्री. संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९७६), विष्णूदास भावे पुरस्कार, बालगंधर्व पुरस्कार, महाराष्ट्र विशेष गौरव पुरस्कार, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (जन्म: ११ मे १९१४)
२०१४ : भारतीय-इंग्रजी इतिहासकार चापमॅन पिंचर यांचे निधन. (जन्म: २९ मार्च १९१४)

## थोडक्यात



### चिंचोली माळीत मनोज जरांगेंचा वाढदिवस साजरा

केज : केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त १ ऑगस्ट रोजी असलेल्या वाढदिवसा निमित्त चिंचोली माळी येथे छत्रपती शिवाजी महाराज राजमुद्रेंचे पुंजन करुन पुष्पहार अर्पण छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदना करून डीजेच्या जल्लोषात संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरी करण्यात आला यावेळी उपस्थित निष्ठावंत शिवसैनिक लक्षीमन तात्या गलांडे , जेष्ठ समाजसेवक गौतम बापु गलांडे,दत्ता गलांडे,मुन्ना नखाते, राजाभाऊ मोटे,माजी सरपंच सुनील बापु देशमुख, अनिल गलांडे सर,राम नखाते ,अशोक गलांडे ,रविकांत मोठे ,लहु हुंबे,गनेश हुंबे ,माऊली हुंबे ,जालीदर हुंबे ,विजय गाडे ,विकास हुंबे ,मच्छिंद्र हुंबे, अतुल गायकवाड, तसेच गावातील नागरिक उपस्थित होते सर्व गावकऱ्यांच्या उपस्थित संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरी करण्यात आला.

### ढाकेफळ झेडपीचे विद्यार्थी चमकले



केज : महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि ब्रिहंत महाराष्ट्र योगा परिषद अंतर्गत बीड जिल्हा योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढाकेफळ चे विद्यार्थी सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी केली.या शाळेतील पवन भरत थोरात आणि आणि सिद्धी जनक थोरात या विद्यार्थ्यांनी आर्टिस्टिक्स सिंगल या योग प्रकारात सहभाग घेतला होता उत्कर्ष भाऊसाहेब घाडगे आणि राजवीर महादेव थोरात या विद्यार्थ्यांनी ट्रॅडिशनल योगा या योग प्रकारात सहभाग घेतला होता दोन्ही प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले .कुमारी सिद्धी जनक थोरात या विद्यार्थिनीने अप्रतिम प्रदर्शन करत जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक पटकावलेला आहे आणि १६,१७,१८ ऑगस्ट तारखेला संगमनेर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी ती पात्र झालेली आहे.या स्पर्धेसाठी योगा प्रशिक्षक श्रीमती , नेहरकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली मुख्याध्यापक श्री अंधारे सर व सर्व स्टाफ शिक्षक यांनी त्यांना सहकार्य केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

### केजमध्ये उबाठा सेनेचा भगवा सप्ताह

केज : शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून दिनांक ४ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट २०२४ या कालावधीत भगवा सप्ताहाचे आयोजन शिवसेना नेते आमदार सुनीलजी प्रभू साहेब मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर साहेब उपनेत्या माननीय सुषमा अंधारे लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील दादा धांडे सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली केज विधानसभा व परळी विधानसभा मतदारसंघात करण्यात आले आहे.सदरील भगवा सप्ताहात शिवसेना प्राथमिक सदस्य नोंदणी अभियान,शिवसेना शाखा उद्घाटन सोहळा,बुथ प्रमुख गट प्रमुख शाखाप्रमुख मेळावे, नवीन मतदार नोंदणी,सह शिवसेना आपल्या दारी अभियान जेष्ठ शिवसैनिक सत्कार विविध प्रश्नांवर आंदोलन सह अनेक सामाजिक कार्यक्रम आयोजित करून भगवा सप्ताहात राबविण्यात येणार आहेत, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गाव तिथे शाखा व घर तिथे शिवसैनिक तयार करून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची ताकद दाखवण्यासाठी मैदानात उतरून पुन्हा एकदा उद्धव साहेबांना मुख्यमंत्री करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणार असे जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांनी माहिती दिली आहे.

### शिव महापुराण कथेची आजपासून सुरुवात

बीड : प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी श्रावण मासा निमित्त प.पू. श्री प्रकाश महाराज साठे धारूरकर यांच्या अमृतवाणीतून आज सोमवार दि. ०५ ऑगस्ट ते रविवार दि. ११ ऑगस्ट २०२४ दरम्यान पेठ बीड भागातील श्री रामेश्वर महादेव मंदिर काकू- नाना मळा, शुक्रवार पेठ बीड येथे दुपारी एक ते चार दरम्यान भव्यदिव्य शिवमहापुराण कथा भक्तीमय वातावरणात संपन्न होत असून कथेच्या सांगतेला रविवार दि.११ ऑगस्ट रोजी दुपारी एक ते चार या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पंचक्रोशीतील महिला, पुरुष भावीकभक्तांनी कथा श्नवणासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कथा यजमान पंचक्रोशीतील सर्व शिवभक्त, जय श्रीराम गणेश मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# संत सावता महाराज दिंडी सोहळ्याने परळी नगरी दुमदुमली



परळी । प्रतिनिधी

श्री संत श्रेष्ठ सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त परळी येथील श्री संत सावता महाराज मंदिरात मागील सात दिवसापासून सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते आज शनिवारी शहरातून दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ज्ञानोबा तुकाराम यांच्या जयघोषाने अक्षरश: परळी शहर दुमदुमून गेले होते. सात दिवसापासून मोठ्या उत्साहात सुरू असलेल्या सप्ताहाची रविवारी काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली आहे.

मागील शेकडो वर्षापासून सुरू असलेली परंपरा आजही माळी समाजाने मोठ्या उत्साहात कार्यान्वित ठेवली आहे ७०० वर्षांपूर्वी सुरू झालेले श्री संत श्रेष्ठ सावता महाराज यांचे पुण्यतिथी समाधी सोहळा परळी सह संपूर्ण महाराष्ट्रात भाविक मोठ्या उत्साहात साजरी करतात परिसरातील शेकडो वर्षापासून येथील श्री संत सावता महाराज मंदिरात तब्बल सात दिवस सप्ताहाचे आयोजन केले जाते या सर्व सात दिवसात महाराष्ट्रातील ख्यातना कीर्तनकार भागवताचार्य भजन गायक वादक यांच्या विविध धार्मिक कार्यक्रमातून सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा केला जातो माळी समाजासह या पंचक्रोशीतील सर्वच जाती-धर्माचे भाविक या सप्ताह सात ही दिवस मोठ्या उत्साहाने सहभागी होतात नाचतात गातात आणि कीर्तनाच्या रंगी तल्लीन होऊन जाता अशा धार्मिक आणि भावनिक साद घालणाऱ्या सप्ताह निमित्त येथील युवक मंडळाकडून सामाजिक उपकरणे राबवली जातात यामध्ये रक्तदान शिबिर, शालेय विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप ,वृक्षारोपण याचे महत्त्व आधी सामाजिक कार्य या सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित केले जातात हा सत्ता केवळ धार्मिक कार्यक्रमाची मेजवानीचे नव्हे तर सामाजिक उपक्रमही तेवढ्याच मोठ्या प्रमाणात राबवल्या जाऊन समाजामध्ये एक आगळे वेगळे समाज प्रबोधन या माध्यमातून केले जाते विशेष म्हणजे महिलावर्ग मोठ्या प्रमाणात या सप्ताहामध्ये सहभागी होतात लहान बालक वृद्ध व्यक्ती या सप्ताहात तल्लीन होऊन जातात, आजच्या दिंडी सोहळ्याच्या आकर्षण म्हणजे शेकडो महिलांच्या डोक्यावरील तुळशी वृंदावन आणि कलश सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. विशेष म्हणजे ज्ञानोबा तुकाराम जयघोष आणि टाळ मृदंगाचा निनादाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सायंकाळी पाच वाजल्यानंतर श्री संत सावता महाराज मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले अंदाजे दहा हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला असल्याचे सांगण्यात येत दरम्यान कोणताही अनुचित प्रकार न घडता आजचा दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आज रविवार दिनांक ४ रोजी सकाळी ११ वाजता काल्याच्या कीर्तनाने या सात दिवस चालणाऱ्या सप्ताहाची सांगता होणार आहे तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोगाच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्रीक्षेत्र कपिलधार येथे प्रतिमाह २३ वी शिवरात्र उत्साहात

## पंडित वीरूपाक्ष आप्पा वैरागकर यांचे मासिकशिवरात्री निमित्त शिवकीर्तन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

**बीड पासून जवळच असलेल्या संत शिरोमणी मन्मथ स्वामी संजीवन समाधीराजे येथे प्रतिमहा एकदिवशी शिवकिर्तन मासिकशिवरात्री निमित्त कीर्तन सेवा आयोजित केली जाते काल दि ३/८/२४ रविवारी रोजी २३ वी शिवकीर्तन सेवा मोठ्या भक्तीमय वातावरणामध्ये संपन्न झाला.**





गेले ४० वर्षे शिवकिर्तन सखोल विवेचन अभंगावर करणारे संगीत विशारद वीरूपाक्ष आप्पा वैरागकर कानेगावकर ता.लोहारा जि.धाराशिव यांची एकदिवशीय शिवकीर्तन नीस्वार्थ पाहीली शुश्राव सेवा केली. या कार्यक्रमात प्रति मासिकशिवरात्री कीर्तन सोहळ्यासाठी शि.भ. प आबा स्वामी कपिलधार डॉ.प्रशांत स्वामी, शंकर स्वामी महाराज जायफळकर,शि.भ.प.सौ. सरस्वतीताई स्वामी अंबाजोगाईकर, शि.भ.प.गुरुलिंग फुटके, शि.भ.प. राजकुमार लखदिवे, विश्वस्त सरपंच अश्रुबा रसाळ, विष्णुपंत वाघमारे, कानडचाप्पा राजाभाऊ तोडकर, गायक श्रीराम आंबेकर, सुनील गुजर, भागवत गोरे, मन्मथ लामतुरे, सिद्धू अंजना नागवसे, सुमन चलवदे, भाग्यश्री खडकी, संगीता तांबवे, पार्वती कोरे, मृदंगाचार्य सागर तसेच शिवनाम सप्ताह तीर मंडळी व हजारोसंख्येने शिवभक्त हजर होते अतिशय भक्तीने वातावरणामध्ये शिव कीर्तन सेवा संपन्न झाली.

### अजित दादांच्या यात्रेची पदाधिकारी, मंत्र्यांवर जबाबदारी

मुंबईः राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार हे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये 'जनसन्मान' यात्रेच्या निमित्ताने महायुती सरकारच्या लोककल्याणकारी योजना व महायुती सरकारने केलेले जनसेवेचे कार्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी दौरा करणार असून या जनसन्मान यात्रेसाठी ७ समन्वयकांची तर ८ सहसमन्वयकांची यादी राष्ट्रवादी काँग्रेसकडून जाहीर करण्यात आली आहे.

जनसन्मान यात्रेसाठी समन्वयक म्हणून सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, कृषीमंत्री धनंजय मुंडे, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मारावबाबा आत्राम, महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे, क्रीडामंत्री संजय बनसोडे, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील यांची तर सहसमन्वयक म्हणून आमदार राजेश विटेकर, महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, राजेंद्र जैन, श्रीमती सुरेखाताई ठाकरे, सुरेश घुले,श्रीमती राजलक्ष्मी भोसले, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी आदींवर जबाबदारी देण्यात आली असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दिली आहे.

## राजस्थानी विद्यालयात जयंतीनिमित्त महापुरुषांना अभिवादन

बीड । प्रतिनिधी

येथील मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालय बीड येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तथा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक सोहनी हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व वक्ते म्हणून तंबरे, कुलकर्णी, ढेपे, तोर, मुळे हे होते.



यावेळी सुमारे ६० विद्यार्थ्यांनी भाषण केली. अतिशय प्रभावी, मुद्देसूद आणि वक्तृत्व कलेची जोपासना करत दोन्ही महान व्यक्तींबद्दल सर्व मुलांनी जीवनापासून त्यांच्या कार्यापर्यंत ओळख करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक सोहनी यांनी दोन्ही महान व्यक्तींनी केलेले कार्य या कार्यातून आपण काय शिकायचे हे विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. त्याचबरोबर प्रमुख वक्ते तंबरे यांनी मी शेंगा खाल्ल्या नाही मी छडी खाणार नाही ही गोष्ट सांगून विद्यार्थ्यांना प्रामाणिक बाणा कसा ठेवावा हे सांगितले. अण्णा भाऊंचा संघर्ष ,त्यांचे विपुललेखन आणि त्यांनी रचलेले पोवाडे याविषयी वक्त्यांनी माहिती दिली.या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मोराळे यांनी केले.तर आभार प्रदर्शन उबाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सांस्कृतिक प्रमुख लड्डा सर व सांस्कृतिक उपप्रमुख बोरा यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वडवणीत संत नामदेव महाराजांचा समाधी सोहळा



वडवणी । प्रतिनिधी


भागवत धर्माचे शिरोमणी आद्य प्रचारक तथा अध्यात्माचे व परमार्थाचे मुकूटमणी शिंपी समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री.नामदेव महाराज यांचा ६७४ वा संजिवन समाधी सोहळा वडवणी शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संत नामदेव महाराजांना अभिवादन करण्यासाठी समस्त शिंपी समाज बांधव उपस्थित होते.

प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी संत शिरोमणी श्री.नामदेव महाराज यांचा ६७४ वा संजिवन समाधी सोहळा शुक्रवार दि.२ ऑगस्ट २०२४ रोजी संत श्री.नामदेव महाराज मंदिर,वडवणी याठिकाणी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सकाळची महापूजा, अभिषेक त्यानंतर संपूर्ण गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत टाळ, मृदंगाच्या साथीने सर्व समाजबांधव व वारकरी संप्रदायाचे असंख्य भाविक भक्त यात सहभागी झाले होते. फटाक्यांची आतिषबाजी व संत नामदेव महाराजांचा जयघोष याने यावेळी संपूर्ण आसमंत निनादून गेला होता. दुपारी ह.भ.प.सुधाकर महाराज चिनके यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले. पंचक्रोशीतील असंख्य भाविकांनी या कीर्तनाचा लाभ घेतला. व आरतीनंतर पुष्पवृष्टीकरुन लागलीच भाविकांनी महाप्रसादाचाही आस्वाद घेतला. यावेळी सर्व समाज बांधव, महिला, युवक, वारकरी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, राजकीय, सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी समस्त शिंपी समाज वडवणी यांनी परिश्रम घेतले.

## केजमध्ये रानडुक्करे घालताहेत धुमाकूळ !

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील शिंदी परिसरात रानडुक्कराच्या कळपाने ऊसाचे नुकसान केले आहे .शिंदी परिसरात व तालुक्यातील रानडुक्करांनी धुमाकूळ घातला आहे तरी वनविभागाने व प्रशासना कडुन बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात येत आहे केज तालुक्यातील शिंदी येथील परिसरात दहा ते बारा रानडुक्करांच्या कळपाने धुमाकूळ घातला असून डुक्करे हातातोंडाशी आलेला ऊस फस्त करत आहेत. सुमारे दोन तीन एकरातील उसाचे डुक्कराच्या कळपाने नुकसान केले आहे. नुकसानीचा पंचनामा करून नुकसानभरपाई मिळावी तसेच वनविभागाने या रानडुक्करांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.शिंदी गावातील सर्वी नंबर २९७ शेतात गेल्या काही दिवसांपासून दहा ते बारा रानडुक्करांच्या कळपाचा वावर आहे. हा



कळप रात्रीच्या वेळी या परिसरातील ऊस फस्त करत आहेत. डुक्करे ऊस निम्म्यातून चघळून टाकतात. यामुळे सुमारे दोन तीन एकर क्षेत्रातील अनेक शेतकऱ्यांच्या उसाचे नुकसान झाले असून त्यांना आर्थिक फटका बसला आहे. यापूर्वी या परिसरात रानडुक्कर कळपाकडून पिकांचे नुकसान झाले आहे.' डुक्करे आली 'ऊसला वाचवा' अशी म्हणायची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. झालेल्या नुकसानीचा पंचनामा करावा, नुकसानभरपाई मिळावी तसेच या डुक्करांचा वनविभागाने बंदोबस्त करावा,केज तालुक्यातुन व शिंदी गावातील शेतकरयांन कडुन अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# बीडमध्ये बिंदुसरा नदीवरील पुल कम बंधाऱ्याचे काम लवकरच सुरू होणार

## डॉ.योगेश क्षीरसागरांचा अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा; टेंडर प्रक्रिया गतीने होणार

बीड । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या बीड शहराजवळील बिंदुसरा नदीवरील पुल कम बंधाऱ्याच्या कामाला लवकरच सुरूवात होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टेंडर प्रक्रिया गतीने पूर्णत्वास जात असून लवकरच काम सुरू होईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाकापर्यंत हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाने मंजूर झालेला आहे. या




मार्गावर बिंदुसरा नदीवर पुल आहे. त्याठिकाणी पुल कम बंधारा उभारण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. यासंदर्भात माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी शासनाकडे मागणी केली होती. त्यानुसार शासनाने पुल कम बंधारा मंजूर केला होता. परंतु पुढे प्रशासकीय पातळीवर संथ गतीने प्रक्रिया सुरू होती. त्यामुळे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी लक्ष घालून उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर पुल कम बंधाऱ्याच्या कामाची टेंडर प्रक्रिया पूर्णत्वास जात असून लवकरच कामाला सुरुवात होईल, अशी माहिती विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला बिंदुसरा नदीवरील पुल कम बंधाऱ्याचा प्रश्न आता मार्गी लागणार आहे.

## डागाचीवाडीचा अमोल मिसाळ बनला पोलीस उपनिरिक्षक

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील अंमळनेर नजीक असलेल्या डागाचीवाडी येथील अमोल महादेव मिसाळ याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगातुन दिलेल्या परिक्षेत पोलीस उपनिरीक्षक पदासाठी पात्र झाला असुन त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. सेवानिवृत्त फौजी महादेव मिसाळ यांचा अमोल हा चिरंजीव असुन शालेय शिक्षणापासुनच तो अगदी हुशार आणि मेहनती होता.जीवनात मी नक्कीच उच्च पदावर जाईल असा विश्वास तो पालक आणि मित्र परिवाराला नेहमीच देत असे.



अमोल मिसाळ याचे बारावीपर्यंतचे शिक्षण अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री. गणेश विद्यामंदिर याठिकाणी झाले.नंतर अभियांत्रिकी मधून पदवी घेऊन स्पर्धा परीक्षाची सुरुवात केली. पोलीस प्रशासनात काम करण्याची आवड असल्यामुळं पीएसआय होण्याचं स्वप्न बाळगलं होत,ते स्वप्न अथक प्रयत्नानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक २०२२ च्या निकालात पीएसआय म्हणून निवड झाल्यानंतर अमोलचे स्वप्न पुर्ण झाले आहे.वडिलांना उच्च पदावर नक्कीच जाईल हा दिलेला शब्द पुर्ण केला आहे.खेड्यात प्राथमिक शिक्षण करुन देखील उच्च पदावर जाता येते हे एका माजी सैनिकाच्या मुलाने दाखवून दिले आहे. अमोल मिसाळ याच्या निवडीने अनेकांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांचे पंचनामे करून तात्काळ मदत द्यावी

## आ.नमिता मुंदडा यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील पाटोदा, देवळा, अंजनपुर, कोपरा, तर बोरगाव या परिसरात गेल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व सततच्या पावसामुळे शेतकर्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी केज मतदार संघाच्या आ.नमिता मुंदडा यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.



अंबाजोगाई तालुक्यातील पाटोदा, देवळा, अंजनपुर, कोपरा, तटबोरगाव या गावात व परिसरात अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे सोयाबीन, तुर, मुग व इतर पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. सततच्या पावसामुळे पुर्ण पिके शेतामध्ये पाणी साचल्यामुळे पिवळे पडून वाळुन जात आहेत. त्यामुळे शेतकर्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकर्यांसमोर विविध प्रश्नांचे संकट उभे आहे. अधिच शेतकर्यांना शेतीसाठी विविध संकटाना सामोरे जावे लागत आहे. त्यात आता झालेल्या सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. अशा प्रकारच्या नुकसान झालेल्या तक्रारी शेतकर्यांकडून आलेल्या आहेत. त्यामुळे वरील गावातील व केज मतदार संघातील ज्या-ज्या गावात नुकसान झाले आहे. त्यातील नुकसानीचे त्वरीत पंचनामे करून शेतकर्यांना नुकसान भरपाई तात्काळ द्यावी. अशी मागणी केज मतदार संघाच्या आ.नमिता मुंदडा यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

### ढगाळ वातावरणाचा पिकांवर परिणाम

गेल्या महिना भरापासुन पावसाच्या सरी पडल्या त्यामुळे पिकांचेही नुकसान झाले व सुर्यदर्शनही होवू शकले नाही. उलट या ढगाळ वातावरणामुळे पिकांवर रोगराईंची वाढ झाली आहे. त्याच बरोबर सामान्य नागरिकांच्या आरोग्य बिघडले, व अनेक रोगांच्या तक्रारी येवू लागल्या. ताप, सर्दी, पडसे अशा विविध आजारांचे प्रमाण वाढले गेले. परिणामी शेतकर्यांना व नागरिकांना या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. जुलै महिन्यात पावसाने रिमझीम का होईना पण चांगलीच हजेरी लावली. ऑगस्ट महिन्यातही ढगाळ वातावरण कायम असल्यामुळे पिकांवर आळीचा प्रार्दुभाव दिसून येत आहे.

# सतर्क नागरिकांनी जखमी काळवीटास वन विभागाच्या स्वाधीन केले

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर आंबेजोगाई रोडवरील कोळपिंपरी शिवारामध्ये रस्ता ओलांडत असलेल्या काळविटास दुपारी दोनच्या आसपास अज्ञात वाहनाने धडक दिली या मध्ये काळवीट जखमी अवस्थेत रोडच्या कडेला पडले होते त्या भागातील शेतकऱ्यांनी व सतर्क नागरिकांनी धाव घेऊन वन विभागाच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क करून त्यांच्या स्वाधीन केले.



धारूर तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वन्यजीव आढळून येत आहेत त्यामध्ये काळवीटाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे खरीप हंगामाच्या पेरणी मुळे सर्वत्र हिरवेगार शेत शिवार झाले आहेत सध्या शेतीमध्ये कापूस आणि सोयाबीनची पिके उभी आहेत चाऱ्याच्या शोधामध्ये या शिवरमधे काळवीटा चे कळप फिरत असतात रस्ता ओलांडत असताना कोळ पिंपरी शिवारामध्ये एका अज्ञात वाहनाने काळवीटास धडक दिल्याने काळवीट जखमी अवस्थेत रोडच्या कडेला पडलेले त्या भागातील. शाम थोरात सरपंच पांगरी व गणेश सौदर वाघोली यांनी तात्काळ वन विभागाचे कर्मचारी भालेराव यांच्याशी संपर्क जखमी अवस्थेत असलेल्या करून पुढील उपचारासाठी वन विभागाकडे सोपवण्यात आले.

# श्रीक्षेत्र कपिलधार येथे श्रावण मासानिमित्त तपोअनुष्ठान

## श्री श्री १०८ सद्गुरु शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांचे ३९ तपोअनुष्ठानास प्रारंभ

बीड प्रतिनिधी



बीड पासून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र मन्मथ स्वामी मंदिर कपिलधार येथे श्रावण मासानिमित्त अनुष्ठानाचे आयोजन केलेले आहे. ही सन १९८५ पासूनची परंपरा असून, यावर्षीचे हे ३९ वे अनुष्ठान आहे .श्रावण महिन्याच्या या पावन पर्व काळानिमित्त या अनुष्ठानामध्ये कीर्तन प्रवचन महापूजा बिलअर्चना,जंगम अर्चना शिवपाठ ,भारुड, शिवनाम अशा भरगच्च विविध कार्यक्रमाचे आयोजन संपूर्ण महिनाभर आयोजित केलेले आहेत. याबरोबरच या मंगल काळामध्ये शांती ,नवग्रह शांती, काळसर्प शांती ,अशा विविध कार्यक्रमाचे देखील आयोजन केलेले आहे तरी या पूर्वकाळामध्ये सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह कमिटीच्या वतीने करण्यात आलेली आहे महाराजांच्या अनुष्ठान कार्यक्रमासाठी आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा आदी विविध राज्यातून लाखो भाविक भक्त कपिलधार येथे उपस्थिती लावतात व या सर्व कार्यक्रमाचा आनंद घेतात शिवनामाच्या गजरामध्ये शिवमय होऊन संपूर्ण भक्तीमय परिसर झालेला असतो तरी या पावन पर्व काळामध्ये पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन समस्त सप्ताह कमिटी यांनी कळवले आहे.

# संत सावता महाराज यांची पुण्यतिथी साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**

संत शिरोमणी सावता महाराज ७२९ व्या पुण्यतिथीनिमीत्ताने आज संत सावता महाराज यांच्या जीवन कार्यावर ह.भ.प बेदरकर महाराज यांनी प्रकाश टाकला ते बोलताना म्हणाले की, सावता बाबा हे प्रेमाचे सागर असून माळी समाजात जन्म घेऊन शेतीचे महत्व त्यांनी सांगितले आहे कामात देव आहे असे म्हणाले.वडवणी शहरातील माळी समाजाच्या वतीने प्रति वर्षापासून कार्यक्रम नंतर महाप्रसादाचा देण्यात येतो .या वर्षी जय सावता च्या घोषात हा कार्यक्रम सुरु झाला जवळपास दोन दीड हजार लोकांनी प्रसादाचा आस्वाद घेतला माळी समाजाच्या वतीने घेतलेल्या



### माळी समाजाचा महाप्रसादाचा उपक्रम

कार्यक्रमाचे कौतुक सर्व समाजानी केले आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी शिंदे,विशाल शिंदे,ज्ञानेश्वर शिंदे, चंद्रकांत शिंदे,अभी शिंदे, नारायण शिंदे,कल्याण शिंदे, कृष्णा शिंदे,दीपक शिंदे, किरण शिंदे ,प्रा.तेजस शिंदे,श्यामराव शिंदे,अमोल शिंदे,बाबा शिंदे,सावता शिंद , गोरख शिंदे, भैय्या शिंदे,माऊली कटारे सह महिलांची युवक -युवतींची मोठी उपस्थिती होती. या कार्यक्रम प्रमुख उपस्थिती बाबूसेठ नहार , बी.एम. पवार,माजी सरपंच वरवडे अण्णा, ◀◀ पान २ वर

# खासगी सावकारास झटका

## विभागीय सहनिबंधकांनी दत्तप्रसाद आजमेरा यांच्या बाजुने दिला निकाल!

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई दि.२ ऑगस्ट: दत्तप्रसाद हरीराम आजमेरा, रा. गेरूवारपेठ, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड यांनी दाखल केलेल्या अपील अर्जामध्ये मोठा विजय मिळविला आहे. जिल्हा सहनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांनी २७ डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) अंतर्गत पारीत केलेला आदेश रद्द करण्यात आला आहे.

या प्रकरणात अर्जदारांनी प्रतिवादी नारायण पांडुरंग रांदड व नरसिंग पांडुरंग रांदड यांच्या विरुद्ध अपील दाखल केले होते. प्रतिवादींनी दत्तप्रसाद आजमेरा यांना ३५ लाख रुपयांचे कर्ज दिल्यानंतर, कर्जाच्या सुरक्षिततेसाठी अर्जदारांकडून २७ मार्च २०१५ रोजी नाममात्र खरेदीखत लिहून घेतले होते. प्रत्यक्षात ही खरेदीखत व्यवहाराची योजना होती आणि कर्जाची परतफेड झाल्यानंतरही मालमत्ता परत देण्यास रांदड यांनी नकार दिला होता.

दत्तप्रसाद आजमेरा यांनी या संदर्भात अपील दाखल करताना उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांचे आदेशाला आव्हान दिले होते आणि सांगितले की, अधिनियमाच्या कलम १६, १७ आणि १८ तसेच नियम १७ चे पालन केले नाही. त्यांनी नाममात्र खरेदीपत्र व्यवहाराची पूर्ण तपासणी न करता निर्णय घेतला होता. अर्जदारांच्या मालमत्तेची शासकीय मूल्यांकन ४१.५० लाख रुपये असून, प्रत्यक्ष विक्रीपत्र व्यवहार रक्कम ३५ लाख रुपये दर्शविण्यात आली होती, त्यामुळे हा व्यवहार सावकारी होता.

जिल्हा सहनिबंधकांनी अर्जदारांच्या सर्व मुद्द्यांचा विचार करून आणि योग्य तपासणी करून उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड यांचे आदेश रद्द केले आहेत. दत्तप्रसाद आजमेरा यांना त्यांच्या मालमत्तेचे हक्क पुनः प्राप्त झाले आहे. त्यामुळे नरसिंह रांदड (राम) व नारायण रांदड (श्याम ) यांच्या खाजगी सावकारकीचा पर्दाफाश झाला आहे.

या प्रकरणात दत्तप्रसाद हरीराम आजमेरा यांचे विधितज्ञ म्हणून ॲड. अमित रोडे यांनी प्रभावीपणे काम केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा यशस्वी निकाल लागला आहे.

# श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर परळी वैद्यनाथ मंदिरात तगडा बंदोबस्त !

परळी वैजनाथ / प्रतिनिधी

हिंदू धर्मातील पवित्र अशा श्रावण मासानिमित्त देशातील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभु वैद्यनाथाच्या नगरीत श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने तयारी पूर्ण झालेली असून शंभराहून अधिक सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यांची मंदिर परिसरावर करडी नजर असणार आहे.देशभरातून येणाऱ्या भाविकांसाठी वैद्यनाथ मंदिर प्रशासन सज्ज झाले आहे.

५ ऑगस्ट सोमवार रोजी श्रावण महिन्याला सुरवात होत असून ४ ऑगस्ट रोजी रात्री १२



### दर्शनासाठी लाखो भाविक होणार दाखल

वाजल्यापासुन प्रभू वैद्यनाथाचे दर्शन सुरु होणार आहे.मंदिर परिसरात देवस्थाचे सुरक्षारक्षक आणि स्वछता कर्मचारी असणार आहेत.मंदिरामध्ये येणाऱ्या प्रत्येक भाविकाची झडती घेऊनच आतमध्ये सोडण्यात येईल.यामध्ये तिन्ही रांगांच्या प्रवेशद्वारावर तपासणी करुन प्रवेश दिला जाणार आहे.

भक्तांसाठी खास पर्वकाळ: यंदाच्या श्रावण महिन्यात ५ सोमवार! ७२ वर्षानंतर दुर्मिळ योगायोग!

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या वैद्यनाथ मंदिरात श्रावण महिन्यानिमित्त तगडा बंदोबस्त असणार आहे. पाहिल्या श्रावण सोमवारसाठी ◀◀ पान २ वर

# बीड शहरात रस्ता विकास कामांचे डॉ. ज्योती मेटे यांच्या हस्ते भूमिपूजन

**बीड । प्रतिनिधी**

सद्यपरिस्थितीत बीडमध्ये सर्वत्र चिखल आणि खड्डेमय रस्ते पहावयास मिळतात मुख्य रस्त्याचे हे हाल आहेत तर गल्लो गल्लीतील रस्ते नसल्याने नागरिक समस्यांना तोंड देत आहेत. अपघात, धूळ आणि चिखल या समस्याने नागरिक हैराण असताना यावर फुंकर घालण्यासाठी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉक्टर ज्योती विनायकराव मेटे यांनी आज बीड शहरांमध्ये तीन कोटी रुपयांच्या विविध रस्ते विकास कामांचे भूमिपूजन केले.



यांप्रसंगी शिवसंग्रामचे जेष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, सुहास पाटील, अनिल घुमरे, प्रा.सुभाष जाधव, नितीन लाटकर, मनोज जाधव, संघर्ष वडमारे,डॉ.राजेंद्र बंड,कैलास शेजाळ, केजकर, बाळासाहेब कुलकर्णी, राम औटे , नामदेवराव शिंदे, अभिजीत जाधव, संभाजी शिंदे, शिवदास राठोड, संतोष भालेकर,हरिश्चंद्र ठोसर, अविनाश पानगावकर, दिलीप गायकवाड, यांच्यासह शिवसंग्रामचे कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

बीड शहरातील भक्ती कन्स्ट्रक्शन, एकनाथ नगर, विश्वेश्वर कॉलनी, परिसरात आज डॉ. ज्योती मेटे यांच्या हस्ते हा भूमिपूजन कार्यक्रम संपन्न झाला या वेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधला यांप्रसंगी त्या बोलत होत्या बीड शहराची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. सर्वत्र अस्वच्छता, पाण्याची समस्या, खराब, धुळमय आणि चिखलानी माखलेले रस्ते या मुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. त्याच बरोबर गेल्या चाळीस वर्षात बीड शहर विकासा पासून कोसो दूर आहे आणि याकडे लोकप्रतिनिधी यांनी दुर्लक्ष केले त्यामुळे आज नागरिकांना या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे बीडकरांचे दुर्दैवच म्हणावे लागेल ◀◀ पान २ वर

# खानापूर येथे मनोज जरागे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप व वृक्षारोपण

म्हसोबावाडी। प्रतिनिधी

तालुक्यातील खानापूर येथील सकल मराठा समाज व समस्त ग्रामस्थ यांच्यावतीने संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.प्रा.शाळा येथे शालेय साहित्य वाटप करण्यात आले तर गावात वृक्षारोपण करण्यात आले आहे.

मराठा आरक्षणासाठी लढा उभा करणारे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी तालुक्यातील खानापूर येथे विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले. यामध्ये येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले तर गावात विविध ठिकाणी वृक्षारोपण करून सामाजिक उपक्रम



राबवून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक ,सरपंच, ग्रा.प.सदस्य.सकल मराठा समाज व ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले.

मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आमच्या खानापूर गावात जि.प.प्रा.शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचं वाटप व वृक्षारोपण केले. जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे आमच्या गावातील संपूर्ण मराठा समाजाच्या कुणबी नोंदी आढळलेल्या आहेत.व गावातील संपूर्ण मराठा समाज ओबीसी आरक्षणात आलेला आहे. हे सर्व श्रेय आमच्या जरांगे पाटलांचे आहे. राज्य सरकारने लवकरात लवकर हैदराबाद गॅजेट, सातारा संस्थांचे दस्तऐवज घेऊन महाराष्ट्रातील संपूर्ण मराठा समाजाला ओबीसी मध्ये आरक्षण द्यावे.










This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

सोमवार दि.०५ ऑगस्ट २०२४ । पान ७

# 'इन्स्टिटयूट ऑफ डायरेक्टर्स'च्या सदस्यपदी 'सूर्यदत्त'चे डॉ. संजय बी. चोरडिया

**पुणे । प्रतिनिधी**

लंडन येथील इन्स्टिटयूट ऑफ डायरेक्टर्स (आयओडी) या संस्थेच्या सदस्यपदी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांची नियुक्ती करण्यात आली. 'आयओडी' ही युनायटेड किंग्डमसह जगभरातील कॉर्पोरेट संचालक आणि वरिष्ठ अधिकारी यांची सर्वोच्च व्यावसायिक संघटना आहे.

या संघटनेशी जगभरातील ३० हजाराहून अधिक मंडळ सदस्य जोडलेले असून, भारत, दुबई, सिंगापूर आणि लंडन अशा ठिकाणी वार्षिक परिषदांमधून सदस्य मंडळासंबंधित विविध विषय आणि प्रश्नांवर चर्चा होते. या सदस्यांमध्ये वैविध्यता असून, त्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य वित्त अधिकारी, लेखापाल, कंपनी सेक्रेटरी, बँकर, सल्लागार, शिक्षणतज्ज्ञ आदींचा समावेश आहे.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचा व्यापक आणि वैविध्यपूर्ण अनुभव लक्षात घेऊन, त्यांना संस्थेचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या नियुक्तीमुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संचालक, व्यावसायिक, धोरण निर्माते इत्यादींसह चांगल्या नेटवर्किंगची संधी देते. या सदस्यत्वामुळे व्यवसाय सल्ला प्रकल्प, इंटर्नशिप्स आणि इतर उपक्रमांतून सूर्यदत्तच्या विद्यार्थ्यांना भारतातील आणि परदेशातील कंपन्यांशी जोडण्यास मदत होणार आहे.

डॉ. संजय बी. चोरडिया जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेले उत्साही शिक्षणतज्ज्ञ, ग्लोबल कोच, उद्योग आणि व्यवस्थापन व्यावसायिक, दूरदर्शी, परोपकारी व्यक्तिमत्व आहेत. त्यांना ऑटोमोबाईल उद्योगातील ४० वर्षांचा आणि शिक्षण क्षेत्रातील २८ वर्षांपेक्षा अधिक प्रदीर्घ अनुभव आहे. केंद्र



सरकारच्या कच्चा माल संचालन समिती, कॉर्पोरेट गव्हर्नन्स, टेलिफोन सल्लागार मंडळ इत्यादी अनेक संस्थांमध्ये सदस्य म्हणून जबाबदारी सांभाळली आहे.

इन्स्टिटयूशन ऑफ इंजिनियर्स, एआयएमए, इंडियन इन्स्टिट्यूशन ऑफ प्रोडक्शन इंजिनियर्सचे फेलो सदस्य, तसेच विविध संस्थांचे पॅट्रॉन सदस्य / आजीवन सदस्य आहेत. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर राज्यपालांचे नामनिर्देशित सदस्य आहेत आणि अमेरिकेतील ग्लोबल चेंबरच्या इन्स्टिट्यूट इंडस्ट्री पार्टनरशिपचे अध्यक्ष आहेत.


डॉ. चोरडिया यांच्या नावावर १०० पेक्षा जास्त राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पेटंट्स असून, त्यांच्या या भरीव योगदानाबद्दल अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या नियुक्तीबद्दल सूर्यदत्त परिवाराच्या त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# नगर-कल्याण महामार्गावर खासगी बस-कारचा भीषण अपघात, २ महिला जागीच ठार

**पुणे । प्रतिनिधी**


नगर-कल्याण महामार्गावरील पिंपळगाव जोगा गावच्या हद्दीत ट्रॅव्हल्स बस व ब्रिझा कारचा भीषण अपघात झाला. ही घटना आज रविवारी (दि. ४) सकाळी घडली. अपघातात दोन महिला जागीच ठार झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

नगर-कल्याण महामार्गावर पिंपळगाव फाटा नजिक कल्याणच्या दिशेने येणारी ब्रिझा कार (क्र. एमएच ४३ सीजी २९१३) व नगरच्या दिशेने जाणारी खासगी बस (क्र. एमएच ४७ बीएल ४२५१) यांची धडक झाली. या अपघातात रिया गायकर व कुसुम शिंगोटे या दोन महिला जागीच ठार झाल्या आहेत. मृत महिला नगर



जिल्ह्यातील कळंब येथील रहिवासी आहेत. जखमींना उपचारासाठी आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे हे पुढील तपास करत आहेत.

# उजनी धरण ८७ टक्के भरले



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे, सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यासाठी जीवनदायीनी ठरलेल्या उजनी धरणात ८७ टक्क्याहून अधिक पाणीसाठा झाला आहे. उजनीवर अवलंबून असणाऱ्या सर्वांसाठी ही आनंदाची बातमी आहे.

उजनीत एकूण ११० पूर्णांक ६३ टीएमसी पाणीसाठा

पाच वाजता उजनीतून २० हजार क्युसेक भीमा नदीत सोडणार

अवघ्या नऊ दिवसात उजनीत जमा झालं ४६ टीएमसी पाणी

आज (रविवार) दुपारी १२ वाजण्याच्या आकडेवारीनुसार उजनी धरण हे ८७.६८ टक्के भरले असून, उजनीत एकूण ११० पूर्णांक ६३ टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे. दरम्यान सायंकाळी पाच वाजता उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्यात येणार आहे.

शुक्रवारी (दि. २६ जुलै) उजनी धरण मायनसमधून प्लसमध्ये आले होते. अवघ्या नऊ दिवसात उजनीत ४६ टीएमसी पाणीसाठा जमा झाला आहे. यंदाच्या पावसाळ्यात एक जुलैपासून आज अखेर पर्यंत उजनीत एकूण ६६ टीएमसी पाणीसाठा जमा झाला आहे. सध्या उजनीत दौंडहुन ८५ हजार १२८ क्युसेक इतका विसर्ग येत आहे.

# पुणे व पीएमआरडीए अग्निशमन दल अलर्ट मोडवर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात कोसळणाऱ्या मुसळधार पाऊसामुळे धरणातून रविवारी (दि.४) सायंकाळी पाच वाजता ४५ हजार क्युसेकने विसर्ग वाढविला असल्याने आपत्कालिन परिस्थिती निर्माण झाली होती. पुणे व पीएमआरडीए अग्निशमन दल नेहमीप्रमाणे रविवारीही अलर्ट मोडवर होते.

पाण्याची पातळी वाढत असल्याने पुणे व पीएमआरडीए अग्निशमन दलाकडून सिंहगड रस्ता एकता नगरी येथे मेगाफोन्स वापरत विसर्गाबाबत पूर्वसूचना देण्यात येत होत्या. त्याचबरोबर त्याठिकाणी तीन बोटी ही दाखल करण्यात आल्या होत्या. निंबोज नगर येथे ही दलाचे जवान कार्यरत होते. या सर्व घटनेत टॉर्च, रश्शी, मेगाफोन्स, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग, बोटी याचा वापर होत आहे. तसेच दत्तवाडी घाट, भिडे पूल, पुलाची वाडी, विश्रांतवाडी टँक रोड, आदर्शनगर, शांतीनगर, ताडीवाला रोड, शिवाजीनगर पाटील इस्टेट झोपडपट्टी परिसर अशा विविध भागात दलाचे जवान कार्यरत होते. दलाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे यांनी विविध ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

एकता नगरी ३५ व निंबोज नगर २५ तर येरवडा आदर्शनगर व शांतीनगर येथून

पुणे व पीएमआरडीए अग्निशमन दलाकडून सुमारे १०० नागरिक अशा एकुण सुमारे १६० जणांना आत्तापर्यंत अग्निशमन दलाने सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. शहर परिसरात १५ झाडपडीच्या घटना (निलायम थिएटर, सादलबाबा चौक, वाकडेवाडी, भांडारकर रोड, गणेश पेठ, अरणेश्वर मंदिर, संगमवाडी रोड, लुल्लानगर, गोखलेनगर, बाणेर रोड, ससून रोड, खडकी, पाषाण, लॉ कॉलेज रोड, कोरेगांव पार्क) येथे घडल्या असून काही ठिकाणी चारचाकी व दुचाकी वाहनांचे नुकसान झाले असून अग्निशमन दलाच्या जवानांनी सदर वाहने काढली असून



रस्ता मोकळा करुन दिला आहे. यामध्ये जखमी कोणी नाही.

अग्निशमन दलाकडून पुरपरिस्थिती निर्माण होणारया ठिकाणी मेगाफोन्सद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या. आमचे माझ्यासह २० अधिकारी व जवळपास ३०० जवान विविध ठिकाणी कार्यरत आहोत.

– देवेंद्र पोटफोडे, मुख्य अग्निशमन अधिकारी, पुणे महानगरपालिका.

वेगवेगळ्या ठिकाणी तैणात असलेल्या तुकड्यांची सद्यस्थिती

नायडू अग्निशमन केंद्र – अधिकारी विजय भिलारे – बर्निंग घाट/ताडीवाला रोड – परिस्थिती नियंत्रणात

काळे बोराटे नगर अग्निशमन केंद्र – अधिकारी अनिल गायकवाड – पाटील इस्टेट झोपडपट्टी – परिस्थिती नियंत्रणात

नवले अग्निशमन केंद्र – अधिकारी प्रकाश गोरे – निम्मज नगर – परिस्थिती नियंत्रणात

जनता अग्निशमन केंद्र – अधिकारी प्रदिप खेडेकर – दत्तवाडी घाट – परिस्थिती नियंत्रणात वारजे अग्निशमन केंद्र – अधिकारी सचिन मांडवकर – तपोधाम वारजे – परिस्थिती नियंत्रणात

येरवडा अग्निशमन केंद्र – अधिकारी सुभाष जाधव – शांतीनगर/आदर्शनगर – परिस्थिती नियंत्रणात

कसबा अग्निशमन केंद्र – अधिकारी कमलेश चौधरी – भिडे पुल – परिस्थिती नियंत्रणात एंडरवणा अग्निशमन केंद्र – अधिकारी राजेश जगताप – पुलाची वाडी/रजपुत वीटभट्टी – परिस्थितीत नियंत्रणात

सिहंगड अग्निशमन केंद्र – अधिकारी प्रभाकर उम्राटकर – एकता नगरी – परिस्थिती नियंत्रणात पीएमआरडीए अग्निशमन दल – अधिकारी विजय महाजन – एकता नगरी व विश्रांतवाडी याठिकाणी कार्यरत

# पुण्यात पावसाचा 'कहर', भारतीय लष्कराचे १०५ जवान तैनात

**पुणे । प्रतिनिधी**

खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये सुरू असणारा विसर्ग वाढवण्यात आला आहे. सकाळी ११:०० वाजता तो ३५००२ क्यूसेक्स इतका करण्यात आला. यामध्ये आवश्यकतेनुसार बदल संभवू शकतो. तसेच पावसाच्या प्रमाणानुसार धरणाच्या विसर्गात पुन्हा कमी/जास्त वाढ करण्याची शक्यता आहे. यामुळे खबरदारी म्हणून भारतीय लष्कराला या ठिकाणी तैनात करण्यात आले आहे. यामध्ये १०५ भारतीय लष्कराचे जवान तैनात केले आहेत. भारतीय लष्कर दलाकडून बचाव कार्यासाठी होडी, ट्यूब, यासं विविध सामग्री आणली आहे.



सकाळी ६ वाजल्यापासून ११ वाजेपर्यंत झालेला पाऊस पुढीलप्रमाणे...

खडकवासला येथे सात मिलिमीटर पाऊस झाला आहे. गेल्या २४ तासात ११ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. पानशेत वरसगाव येथे १४ मिलिमीटर पाऊस झाला आहे. येरवडा येथे १६ मिलिमीटर पाऊस झाला आहे. मुळशी तालुक्यातील कुंभेरी येथे ५४, ताम्हिणी येथे ३१ आणि लवासा येथे १७ मिलिमीटर इतका पाऊस पडला आहे.

# हनी ट्रॅप टोळीचा म्होरक्या निघाला 'पीएसआय'

**पुणे । प्रतिनिधी**

हनी ट्रॅप टोळीमध्ये शहर पोलिस दलातील पोलिस उपनिरीक्षकाचा (पीएसआय) सहभाग असल्याचे आढळून आले आहे. काशिनाथ मारुती उभे (वय ५५) असे पोलिस उपनिरीक्षकाचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. टोळीतील महिलांना अटक केल्याची चाहूल लागताच उभे याने पळ काढला असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत. दरम्यान, यापूर्वी विश्रामबाग पोलिसांनी, टोळीतील तीन महिलांना १ ऑगस्ट रोजी अटक केली. न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. त्यातील एका महिलेवर कोल्हापूर येथील शाहूपुरी पोलिस ठाण्यात डॉक्टरला ५० लाखांची खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले, टोळीने अशाप्रकारे आणखी काही जणांना जाळ्यात खेचून लुटल्याचा संशय आहे.

बदनामीच्या भीतीपोटी त्यांनी तक्रारी दिल्या नसल्याची माहिती आहे. याप्रकरणी ६४ वर्षीय नागरिकाने दिलेल्या फिर्यादीनुसार, विश्रामबाग पोलिसांनी तीन महिला आणि एका पुरुषाविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. हा प्रकार २९ जुलै रोजी दुपारी सव्वातीनच्या सुमारास अलका टॉकीज चौकातील सदाशिव पेठेतील लॉजमध्ये घडला.

असे फुटले टोळीचे बिंग

दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने विश्रामबाग पोलिसांच्या तपास पथकाचे प्रमुख पोलिस उपनिरीक्षक मनोज बरुरे तपास करत होते. ज्या लॉजवर हा प्रकार घडला तेथील रजिस्टर आणि सीसीटीव्ही फुटेज बरुरे यांनी तपासले. त्या वेळी फिर्यादीसोबत प्रथम ओळख करणाऱ्या एका महिलेच्या आधार कार्डची माहिती हाती लागली. तसेच सीसीटीव्ही फुटेजमध्ये गुन्ह्यात वापरलेली गाडी दिसून आली.

कोथरूड परिसरातून तिघा आरोपी महिलांना ताब्यात घेतले. तर दुसरीकडे गाडीची माहिती घेतील तेव्हा ती मुळशी तालुक्यात एका व्यक्तीच्या नावावर असल्याचे दिसून आले. त्याची चौकशी केली तेव्हा ती गाडी पोलिस अधिकारी उभे वापरत असल्याचे समजले. आरोपी महिलादेखील याबाबत काही बोलत नव्हत्या. मात्र, बरुरे यांनी कौशल्यपूर्वक तपास करत महिलांना बोलते केले. त्या वेळी त्यांनी त्यांच्यासोबत असलेली व्यक्ती पोलिस उपनिरीक्षक काशिनाथ उभे असल्याचे सांगितले.

पाहा, नेमका कसा घडला प्रकार?

याबाबत बोलताना पोलिस सांगतात, की फिर्यादी ज्येष्ठ नागरिक एका खासगी कंपनीतून निवृत्त आहेत. एका महिलेने त्यांच्याशी ओळख करून घेतल्यानंतर आजारी असल्याचे सांगत उपचारासाठी दोनदा पैसे घेतले. हॉटेलमध्ये जेवण करताना त्यांना सोमवारी दुपारी अलका टॉकीज चौकातील एका लॉजवर बोलावून घेतले. थोड्या वेळ गप्पा मारल्यानंतर रूममध्ये दोन महिला आणि एक पुरुष घुसले.

त्यांनी महिला हक्क संरक्षण समितीच्या सदस्या, तर पुरुषाने पोलिस असल्याचे सांगत चापटी मारण्यास सुरुवात केली. तसेच अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. तेव्हा सोबत असलेल्या महिलेनेदेखील कांगावा केला. यानंतर ज्येष्ठाकडे पाच लाखांच्या खंडणीची मागणी केली. तडजोडीअंती तीन लाख द्यायचे ठरले. ज्येष्ठाच्या खिशातील २० हजार रु. काढून घेतले. तसेच एटीएममधील ६० हजार काढण्यासाठी त्यांना कारमध्ये कोंबून कर्वे पुतळ्याजवळ नेले.

तेथे एका सराफी दुकानात अंगठी विकायला लावली. मात्र, दुकानदाराने बदल्यात सोने घ्यावे लागेल असे सांगितल्याने तो डाव फसला. यानंतर ज्येष्ठाला एटीएम सेंटरमध्ये पाठवले. परंतु त्याने चुकीचा पिन टाकल्याने पैसे निघाले नाहीत. यामुळे त्यांना मारहाण करत घरातून चेक आणून देण्यास सांगितले. तसेच मोबाईल फोनही काढून घेतला. ही संधी साधत ज्येष्ठाने पुढील चौकातून रिक्षा पकडत पळ काढला.

छापा मारणारा तो पोलिस अधिकारी

'उभे' पोलिस उपनिरीक्षक उभे हा गुन्ह्याच्या संपूर्ण कटात सहभागी असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. लॉजवरील खोलीत प्रवेश करणारा पोलिस हा उभे होता. तर महिला हक्क संरक्षण समितीच्या सदस्या इतर दोन आरोपी महिला होत्या. उभे यानेच फिर्यादीला दम भरला, उभे याने पोलिस असल्याचा धाक दाखवून मारहाण केली. तर फिर्यादी ज्येष्ठखला ज्या गाडीतून डांबून घेऊन जाण्यात आले, ती गाडी उभे याचीच होती. सुरुवातीपासून शेवटपर्यंत उभे हा हनी ट्रॅप टोळीत सहभागी होता.

# अजितदादांच्याच माजी आमदाराने शरद पवारांना रसद पुरवली : आ. दिलीप मोहिते-पाटलांचा आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

'खेड आळंदी विधानसभा मतदार संघात जावयाला तिकीट देण्यासाठी तसेच भोसरी मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांचा काटा काढण्यासाठी अजित पवार गटाच्या एका माजी आमदाराने पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे दोन डझन नगरसेवक शरद पवार गटाला नेऊन दिले आहेत', असा गंभीर व खळबळजनक आरोप खेडचे अजित पवार गटाचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी केला आहे. 'हिम्मत असेल तर या माजी आमदारांनी माझ्या विरोधात निवडणूक लढवून दाखवावी,' असे आव्हान मोहिते-पाटील यांनी भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांना अप्रत्यक्षरित्या दिले आहे.

विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्याने राजकिय वातावरण तापले आहे.

पुणे, पिंपरी चिंचवड महानगर तसेच ग्रामीण भागातील विधानसभा मतदार संघात कुरघोडीच्या राजकारणाने वेग घेतला आहे.प्रत्यक्ष निवडणुकी पुर्वी अनेक खलबते उदयाला येऊ लागली आहेत.महायुती विरोधात महा विकास आघाडीचे उमेदवार यांच्यात खरी लढत होणार आहे. एक अपवाद वगळता

पुणे जिल्ह्यातील बहुतांशी आमदार हे अजित पवार गटाकडे आहेत. त्यांचा करेक्ट कार्यक्रम करण्या साठी शरद पवार, उध्दव ठाकरे गटांकडून वेगवेगळे प्रयोग केले जात आहेत.

महायुती कडून विद्यमान आमदार पुन्हा निवडणुकीत असणार आहेत. त्यांना रोखणारा नवा चेहरा शरद पवार



गटाला हवा आहे. यातुनच टोकाच्या राजकारणाचा मोहरा शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अजित पवार गटाच्या माध्यमातून जिल्हाभर वावरत असलेले माजी आमदार त्यांच्या गळाला लागल्याचे बोलले जात आहे.

'खेड आळंदी विधानसभा मतदार संघात आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या विरोधात शरद पवार गटाकडून माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख, मी सेवेकरी फाऊंडेशनचे अध्यक्ष सुधिर मुंगसे, माजी सभापती रामदास ठाकुर यांच्या नावांची उमेदवारी साठी चर्चा आहे. तर भोसरी मतदार संघाचे भाजपचे आमदार महेश लांडगे यांना थोपविण्यासाठी नगरसेवक अजित गव्हाणे यांना पक्षात प्रवेश देण्यात आला आहे. खेडमधून इच्छुक असलेले सुधीर मुंगसे हे लांडे यांचे जावई आणि भोसरी मतदार संघातून इच्छुक झालेले अजित गव्हाणे हे लांडे यांच्या मेहुणीचे चिरंजीव आहेत. मुळात गव्हाणे व सहकारी नगरसेवक हे यापूर्वी अजित पवार गटात होते. लोकसभा निवडणुकीत त्यांनी महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार केला. मात्र महायुतीकडून विद्यमान आमदार महेश लांडगे हे पुन्हा उमेदवार होणार असल्याने संधी मिळवण्यासाठी हालचाली सुरू झाल्या. नेमका त्याचा लाभ घेण्यासाठी माजी आमदाराने खेड आळंदीत माझ्या जावयाला तिकीट द्या, असे सांगून गव्हाणे व त्यांच्या सहकाऱ्यांना शरद पवारांच्या स्वाधीन केले,' असा गौप्यस्फोट केला.

ते पुढे म्हणाले, 'जयंत पाटील यांच्या माध्यमातून या घडामोडी घडल्या. हा अजित पवार गटाला मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे. यावरून अशा नेत्याने आमच्या पक्षात राहण्यापेक्षा राजरोस विरोधात जावे. जास्तच खुमखुमी असेल तर खेडमधून इतरांची पाठराखण करण्यापेक्षा माझ्या विरोधात निवडणूक लढवून दाखवावी असे आव्हान आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी संबंधित माजी आमदारांना दिले आहे. शिवाय उपमुख्य मंत्री अजित पवार यांच्या कडे तशी तक्रार देखील करणार आहोत, असा इशारा मोहिते पाटील यांनी दिला.

चाकण एम आय डी सी मध्ये कोणताही अनुचित प्रकार घडला नसताना इथे कारखानदारांना धमकावले जाते. अशी लक्षवेधी याच माजी आमदार महोदयांनी मांडली होती. स्व आर आर पाटील गृहमंत्री असताना आमच्या अनेक समर्थकांना पोलिसां करवी घरातुन उचलुन नाहक त्रास दिला. माझ्याबद्दल खोटे नाटे सांगुन शरद पवारांचे मत वाईट बनवले. पुढे तालुक्यात विकास कामे आणताना मला खुप संघर्ष करावा लागला. खेड बाजार समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे पॅनल असताना यांनी विरोधी पक्षातल्या भाच्याचा उघड प्रचार केला.घरचा भेदी असलेला हा नेता मला नेहमीच टार्गेट करीत आला आहे. लोकसभेला यांनी बरोबर राहुन विरोधात काम केले.